## प्रकरण तिसरे

## गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनातील

## व्यक्तिचित्रणे

# प्रकरण तिसरे

## गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनातील व्यक्तिचित्रणे

आशयसूत्रे व घटनाप्रसंगांचे चित्रण हे जसे वैशिष्टयपूर्ण व महत्वपूर्ण घटक असतात त्याचप्रमाणे व्यक्तिचित्रण हा ही कथासाहित्याचा एक असा महत्वपूर्ण असा घटक असतो. गौरी देशपांडे यांच्या साहित्यामध्येदेखिल स्वाभाविकपणे याचा प्रत्यय येतो.

गौरी देशपांडे यांनी स्त्रीला केंद्र कल्पूनच कथानिर्मिती केलेली आहे. असे असले तरी या कथांत एका विशिष्ट टप्प्यातल्या स्त्रियांचे चित्रण आढळून येते. किशोरवयीन मुली, विशीच्या आतील अल्लड मुली, वृध्द बायांचे चित्रण कुठेही आढळत नाही. परंतु स्त्रियांच्याच व्यक्तिरेखा त्यांच्या कथांत अधिकाधिक ठसठशीतपणे आलेल्या दिसतात. या व्यक्तिरेखांमध्ये कांही बंडखोर स्त्रियांचे चित्रण केलेले आहे. तसेच कांही पारंपरिक मूल्ये स्वीकारणाऱ्या स्त्रियांचेही चित्रण केले आहे.

### १) गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातील बंडखोर स्त्री :

#### राधा :

> "समाजाचे आणि कुटुंबाचे संकेत झुगारून देऊन आपल्या मनाप्रमाणे आपल्या आयुष्याला आकार देणारी स्त्री."

जीवनात पतीवर व प्रियकरावर अफाट प्रेम करणारी राधा, वास्तवामध्ये येणारे कोणतेही मूल्य विचाराने स्वीकारणारी राधा, तिच्या दृष्टीने जे सहजसे वाटते ते सर्वसामान्यांच्या दृष्टिकोनातून बंड असते. पतीचा मृतदेह समोर असताना, घरात आणून ठेवलेले आईस्क्रिम विरघळेल याकडे लक्ष असणारी

असणारी राधा, पतीचा मृतदेह बिनदिक्कतपणे हॉस्पिटलला देणारी राधा, पित्याच्या निधनाने शोकाकूल झालेल्या मुलांना पाहून चिडणारी राधा, "फरहद" तिचा प्रियकर यावेळीही त्याचीच वाट पहाताना बेचैन होणारी राधा, माणूस जन्माला आल्यावर त्याला मृत्यू हा अटळच आहे. तेंव्हा त्यात काय एवढे शोक करण्यासारखे आहे ? असे परखड विचार करणारी राधा व तिचा हा निर्भीडपणा, बंडखोर दृष्टीकोन एकाचवेळी पती, मुलांचे वात्सल्य प्रेम आणि प्रियकराचे प्रेम हा एक जबरदस्त प्रेमाचा धागा गेलेल्या पतीच्या केंद्राभोवती फिरताना दिसतो आणि ही एक बंडखोर स्त्री म्हणून उभारताना दिसते. "एकेक पान गळावया" [१] या दिर्घकथेची नायिका राधा, बंडखोर आहे. व्यक्तिस्वातंत्र्य हे तिच्या जीवनाचे मूल्य आहे. तिच्या मनावर नीती-अनितीच्या पारंपरिक कल्पना, नैतिक संघर्ष, समाजभय, समाज नियमांचा भंग, कुटुंब पध्दतीची आचारसंहिता या कशाचेही ओझे नाही. तिला स्वत:चे-ही भय नाही. कारण ती स्वत:लाही स्वत:पासून लपवत नाही. उलट स्वत:-च्या लालसा, वासना, शारीरसंवेदना, आसक्ती यांना "आहे हे असं आहे" अशा प्रांजळपणे स्वीकारते. म्हणून स्वत:ला नाकारण्यातून होणारी आत्मपीडा नाही. तर वास्तव जगाशी सामोरे जात असताना ती कुठेही डगमगत नाही. जे तिच्या मनाला रुचेल, पटेल, भावेल तेच ती तर्कशुध्द पणे, विचारांती करते. अगदी निर्भिडपणे स्वत:चे निर्णय स्वत: घेते. उच्चवर्गीय समाजातील या स्त्रीला 'माधव'सारखा आर्थिक परिस्थितीने खंबीर असलेला व तिच्यावर अटोकाट प्रेम करणारा, आधुनिक विचाराचा पुरुष पती म्हणून लाभलेला आहे. दोन मुली व एक मुलगा एवढेच कुटुंब पण प्रत्येक मुलाला पूर्ण स्वातंत्र्य आहे. प्रत्येक मुलाला उच्च शिक्षण देऊन त्यांना आपापल्या पायावर उभे राहण्या इतपत समर्थ बनविले आहे. मुलांवर आपली मते कधिही लादली गेली नाहीत. तर उलट "आपल्या आयुष्याचा आराखडा आपणच बनवायचा

असतो व योग्य आयोग्याची जाण ठेऊन आपलं आयुष्य आपणच जगायचं असतं, असं तिचं मत आहे. तिची मुलगी "नीरजा" ही डॉक्टर आहे व ती एका प्रौढ विवाहित पुरुषाशी विवाह करुन इच्छिते. तेंव्हा राधा तिला सांगते, "आयुष्य तुझं आहे. त्यातले निर्णय तू घ्यायचेस. मी तुझा निषेधही करीत नाही आणि वाहवाही. पण निदान तू स्वत:ची प्रतारणा करु नकोस." (पृ.क्रे.१२६) व्यक्तिस्वातंत्र्य हे जीवनाचे मूल्य जपणाऱ्या या बंडखोर राधेच्या मनावर नीती अनीतीच्या पारंपारिक कल्पनांचा मागमूसही नाही. पारंपरिक भारतीय संस्कृतीतील स्त्रीपेक्षा ही स्त्री अगदी वेगळ्या वळणाची आहे. बाणेदार आहे. मनाने अत्यंत सरळ आहे, स्वतंत्र विचारांची आहे, प्रामाणिक आहे. "स्व"ला जपणारी आहे. मुक्त विचारांची आहे. मुलांना पूर्ण स्वातंत्र्य आहे. असे असले तरी राधाच्या मुलांना न्युनगंडाने ग्रासलेले आहे. राधाचा स्वतंत्रपणा, बेपर्वाई, बुध्दीमत्ता, अफाटपणा यांचा तिच्या मुलांना अर्थच कळत नाही. आई बापांनी त्यांना भरपूर स्वातंत्र्य आणि उडायचं बळ दिलं असलं तरी त्यांना हवं असतं 'गुंतवून टाकणारं प्रेम आणि उबदार घरटं', पण ते त्यांना मिळू शकत नाही.

राधा आणि माधव हे आधुनिक विचारांचे पती-पत्नी आहेत. दोघेही स्वतंत्र व तर्कशुध्द विचार करणारी आहेत. त्यांच्यातील आंतरिक ओढ तर सुखदु:ख, रागलोभ या सर्वांना व्यापून उरणारी आहे. म्हणूनच जणू आपल्यावर प्रेमाची बरसात करणाऱ्या नवऱ्याचे अन्य स्त्रियांशी संबंध आहेत हे कळल्यावर राधा व्याकूळ होते खरी. पण तीव्र दु:खाच्या या लाटानंतर राधा ते सारं सहजपणे मनाआड करते. "त्या वेळेपासून माधव आणि इतर स्त्रिया हा विषय तिने कुलुपबंद करुन टाकला आणि किल्ली फेकून दिली. आपल्याला कर्तव्य नाही. आपल्याला माहितही नाही." (पृ.क्र.१५५) अशा ती मनाशी ठाम निश्चय करुन आपले जीवन आपल्या स्वत:च्या मनाला वाटेल, आवडेल तसे जगते. तिच्या जीवनाच्या तत्वांशी ती कधिही तडजोड करीत नाही व

दुस-यावर तिचे कांहीही अवलंबूनही नाही. ती स्वतंत्र आहे. माधवच्या मृत्युनंतर न डगमगता पुढील निर्णय पटपट घेते. पारंपरिक स्त्रीप्रथांना कुरवाळत, शोक करीत बसत नाही. तर पुन्हा जोमाने उभी राहते व आपले जीवन जगू लागते. तिच्यावर जीवापाड प्रेम करणारा व संपूर्ण आयुष्य तिच्या आठवणीत अजूनही अविवाहीत राहून तिची वाट पहाणारा तिचा प्रियकर जेव्हा ती विधवा होते तेव्हा तिला लग्नाविषयी विचारतो. तेव्हा ती अत्यंत तर्कशुध्दपणे विचार करून, संयमाने या पुनर्विवाहाच्या बंधनात बंदिस्त न होता त्यांच्यातील पवित्र मैत्रिचे नातेच जोपासते. प्रथेप्रमाणे त्याच्याशी विवाह केलाच पाहिजे असे तिला वाटत नाही. ती बंडखोर असली तरीही चुकीचे निर्णय अजिबात घेत नाही. प्रत्येक निर्णय अतिशय तर्कशुध्दपणे विचार करूनच घेते व आपल्या मनाप्रमाणे आपल्या आयुष्याला आकार देते.

सुहास : "स्त्रीच्या जीवनातील पतीचे स्थान प्रश्नचिन्हांकित करु पाहणारी स्त्री."

स्वत:च्या जीवनात आर्थिक सुबत्ता, शैक्षणिक सर्वस्व, कोणत्याही प्रकारचे वैभव कमी न पडणारी, म्हणण्यापेक्षा परमेश्वराने हे वैभव भरभरून तिला दिलेले आहे. ना पैसा कमी, ना ज्ञान कमी, ना कोणत्याही प्रकारची सुबत्ता कमी आणि असे असताना सुध्दा स्त्रीला सांभाळण्यासाठी जीवनामध्ये पुरुष पाहिजे हे परंपरेतून आलेले मूल्य न स्वीकारणारी स्त्री. मनात जर आले असते तर ती सहज कोणाशीही लग्न करु शकली असती. पण विचाराने तिला एक दानत दिलेली आहे की, आपल्याला सांभाळणारा पतीच पाहिजे हे मूल्यच आपण स्वीकारायचे नाही. आपल्यावर प्रेम करणारे आई-वडिल, भावंडे, इतर मित्र-मैत्रिणी असताना, मग पतीच का ? किंबहुना लेखिकेला इथे एवढेच दाखवायचे आहे की, स्वत:च्या विचारांना जोपासणारी स्त्री, पती हे जीवनाचे बंधन होईल म्हणून ते आपण स्वीकारायचे नाही. अशा

एका वेगळ्याच बंडखोर विचारातून जीवनाची वाटचाल करताना दिसते व हे करताना तिला कांही यातनाही सोसाव्या लागतात. अफाट प्रेम करणारा सिध्दहस्त डॉक्टर मित्र, प्रियकर लाभलेला असताना स्वत:च्या वैचारिक मूल्यांना सांभाळणारी ही बंडखोर स्त्री.

प्रियकराला आपले सर्वस्व अर्पण करुन, क्षणिक दुरावाही असह्य होत असलेल्या परिस्थितीतही हे सर्व पाश तोडून आप्तस्वकीयांच्या ओढीने मायदेशी परत येते. मनात बंड आहे आणि बाहेरही बंड आहे अशी ही बंडखोर स्त्री.

जन्मत:च जिच्या वाट्याला केवळ प्रेमच आलेले आहे अशी "चंद्रिके ग सारिके ग" [२] ची भाग्यशाली नायिका सुहास, रुपाने चार चौघींमध्ये उठून दिसणारी, पीएच्.डी. ही अतिउच्च पदवी प्राप्त केलेली गर्भश्रीमंत कुटुंबातील व चार भावंडात एकटीच लाडकी असलेली नायिका. हीची एक वेगळीच बंडखोरी दिसते. तिने आजीवन कुमारिका राहण्याचेच व्रत घेतले आहे. ती पुरुषाकडे एका वेगळ्याच दृष्टिकोणातून बघते. स्त्रीचे रक्षण करण्यासाठी कुणा पुरुषाचीच गरज असते हे तिला अजिबात मान्य नाही. मात्र स्त्री पुरुषांतील नातेसंबंधाना ती जोपासते. ती कर्तृत्ववान आहे, उच्चशिक्षित आहे. बंडखोर आहे. तिला लग्न करणे अजिबात अवघड नाही. परंतु तिने मनाशी लग्न न करण्याचा जो निर्णय घेतलेला त्या तत्वाशी ती कोणत्याही परिस्थितीत तडजोड करीत नाही.

अमेरिकेत शिकत असताना "मिचेल" या उच्च शिक्षित, संख्याशास्त्राचा डॉक्टर असलेल्या श्रीमंत माणसाशी तिचे प्रेमसंबंध जुळतात, ते दृढमूल होतात. दोघांना एकमेकांची खूपच सवय झालेली असते. पण पीएच्.डी. ची पदवी मिळताच मनाला मुरड घालून ती परतते. सुहासने विधेच रहावे. आपल्याशी

विवाह करावा, संसार थाटावा असे मिचेलला मनापासून वाटत असते. तो तिला विनंतीही करतो. पण ती आपल्या निर्णयापासून बिलकूल परावृत्त होत नाही. ती मायदेशी परतते. परंतु ती मिचेलला विसरू शकत नाही. ती मनाने अत्यंत कासावीस होते. मिचेलला तिचे लांबसडक केस खूप आवडत असतात. तो तिच्या केसांवर खूप प्रेम करीत असतो. मुक्त शृंगाराच्या वेळचे प्रसंग आठवल्यावर ती खूप अस्वस्थ होत असते, म्हणून तिने आपले सुंदर, लांबसडक केस सुध्दा कापून टाकले. असे जरी असले तरी मिचेलच्या संगतीत घालविलेल्या घटनांच्या आठवणी तिला क्षणोक्षणी अस्वस्थ करीत असतात. पण ती अत्यंत संयमाने यावर मात करीत असते. पण आपल्या मनोनिग्रहाशी प्रामाणिक राहण्याचाच ती प्रयत्न करते. नवरा म्हणून कुणी तरी विशिष्ट पुरुष हवाच हे तिला पटत नाही. त्यामुळे ती लग्न करीत नाही. तर ती स्वकर्तृत्वावर जगते. मिचेलशी आलेल्या प्रेमसंबंधाचे पाश तोडून ती जेव्हा मायदेशी परतते तेव्हाही तिला "समरेंद्र पॉल" या बंगाली फॅक्टरीच्या एम्.डी. मध्ये आकर्षण निर्माण होते. हे आकर्षण प्रेमात बदलते पण कांही मर्यादेपर्यंतच. कांही वर्षानंतर मिचेल तिला भेटण्यासाठी व आता तरी आपल्या बरोबर कायमची येईल या अभिलाषेने येतो. कारण तिचे आईवडिल आता हे जग सोडून गेलेले आहेत. तेव्हा ती परत येईल म्हणून येतो. परंतु ती अत्यंत तर्कशुध्दपणे विचार करुन, अत्यंत संयमाने, निर्भिडपणे त्याच्याबरोबर जाण्याचे टाळते. उलट त्याला म्हणते "मीच तिकडे आले पाहिजे असं कुठे आहे. तूच इथे राहिलास तरी चालेल." यावरुन तिचा निर्भिडपणा व मुक्त विचारांचा प्रत्यय येतो. ती धीट आहे. "स्व"ला जपणारी आहे. स्वत:चे निर्णय स्वत: तर्कशुध्दपणे घेते व आपल्या मनाने ठरविलेली आपले जीवन जगण्याची जी स्वतंत्र नीतीमूल्ये आहेत त्या नीतीमूल्यांना, तंत्राला कुठेही मुरड न घालता, कोणत्याही परिस्थितीत तडजोड न करता ठामपणे ती जोपासते. हे जीवन, हे जगणे तिचे स्वत:चे आहे. तेव्हा ती ते आपल्यापरीने जगते. ती चंचल नाही.

ठाम निश्चयी आहे. ती आपल्या जीवनावर प्रेम करते. तिचा आपल्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास आहे. ती कर्तृत्ववान आहे. तिची एकंदरीत सर्वच परिस्थिती उत्तम असूनही ती लग्नाच्या बेडीत अडकून पडत नाही. लग्न न करता स्व कर्तृत्वावर अत्यंत निर्भिडपणे व संयमाने जीवन जगणाऱ्या या बंडखोर स्त्रीचे चित्रण गौरीबाईंनी अत्यंत अलिप्तपणे व तटस्थपणे केलेले आहे.

कालिंदी : "शरीर वासनांच्या बाबतीमध्ये नीतीमूल्यांच्या पारंपरिक संकेतापेक्षा आपल्या मन:प्रवृत्तीचा कौल घेऊन वागणारी स्त्री".

"मुक्काम" [3]ची नायिका कालिंदी ही नंदनची धर्मपत्नी. पतीवर श्रध्दा असणारी पण नंदनला तिची फारशी कदर नाही. विवाहानंतर मंदा या मतिमंद मुलीला जन्म दिल्यावर तर या दोघांमध्ये अधिकच दूरत्व निर्माण होते. नंदन हा बिझनेसच्या निमित्ताने सतत परदेशा दौ-यावर असतो. त्याचे अन्य स्त्रियांशी संबंध असतात. मात्र कालिंदी यावर कधिही आक्षेप घेत नाही. पती म्हणून आपण कांही देणे लागतो हे तो विसरतो. कालिंदीला कधी जिवंत करण्याचा तो प्रयत्न करीत नाही. तिची त्याला अजिबात गरज नाही. याची कालिंदीला ठाम खात्री पटते. तेव्हा ती कोणत्याही प्रकारचा अविचार अथवा अकांड तांडव न करता आपल्या जीवनाला एक वेगळे वळण देते. ती सुशिक्षित आहे. तर्कशुध्द विचार करणारी आहे. ती अत्यंत प्रामाणिक व सरळ स्वभावाची, मोकळया मनाची आहे. ती नंदनकडून दुखावली गेलेली आहे. इयन, दिमित्री सारखे तिच्यावर निखळ प्रेम करणारे पाश्चात्य संस्कृती-तील पुरुष आहेत. दिमीत्री देखिल विवाहीत आहे. परंतु तो कालिंदीवर इतका भाळतो की त्यांचे हे प्रेमसंबंध सर्व मर्यादा ओलांडतात. दिमित्री व अंगोलिकी हे दोघे पती-पत्नी, पण ते फार काळ या नात्यांत बांधिल रहात नाहीत. त्या दोघांचा घटस्फोट होतो. पाश्चात्य संस्कृतीत ही घटना अत्यंत तुजबी

मानली जात असली तरी भारतीय संस्कृतीत हे तितके सोपे नाही. तेव्हा नंदन व कालिंदी विभक्त जरुर होतात पण त्यांचा घटस्फोट होत नाही. ते दोघे एकमेकांपासून विभक्त, स्वतंत्र राहू लागतात. कालिंदीच्या खर्चाची तजवीज नंदनने करावी अशी तिची अपेक्षा नाही. इतका श्रीमंत, कर्तृत्वान नवरा असताना ती त्याच्याकडून कोणतीही अपेक्षा न करता स्वत: तळेगावला अपंग पुनर्वसन केंद्रात नोकरी करु लागते. ती अत्यंत समंजस व मोकळ्या मनाची असलेने तिचे सर्व लोकांशी लगेच मैत्रीचे संबंध जुळून जातात. या पुनर्वसन केंद्रात आल्यावर तेथील "गंप्या" या मतिमंद मुलाला पाहून तिला मंदाची आठवण होते व तिचे मातेचे मन ओलावते. ती या कामाशी अगदी समरस होते व केंद्रातील सर्वात लोकप्रियही होते.

परंतु नंदनने तिला कधी समजूनच घेतलेले नाही. त्याने तिची अवहेलनाच केलेली आहे. परंतु तिच्यावर जीवापाड प्रेम करणा-या दिमित्रीचा जेव्हा मोठा अपघात होतो व त्यामध्ये त्याला बरेच शारीरिक अवयव गमवावे लागतात. कालिंदी जेव्हा कांही वर्षानंतर त्याला भेटायला ग्रीसला जाते तेव्हा त्याचा व अंगोलिकीचा घटस्फोट झालेला आहे व या भयानक अपघातातूनही तो अत्यंत शिस्तीने वाचतो, ते केवळ कालिंदीच्या आठवणीवर. तो अत्यंत संयमाने परिस्थितीशी मुकाबला करुन त्यावर मात करतो व कालिंदीच्या आठवणीवर जगत असतो.

अपघातानंतर विद्रूप झालेल्या दिमित्रीला पाहून कालिंदीचे मन अजिबात बदलत नाही, तर उलट तिला त्याची किवच येते. दिमित्री आणि कालिंदी ? हे दोघेही वेगवेगळ्या संस्कृतीतील, परप्रांतीय, दोघेही विवाहित, परंतु ती आपापल्या वैवाहिक जीवनात दुखावली गेलेली आहेत. दोघांची विचारसरणी मिळती जुळती आहे. दोघेही वैचारिक व मानसिक पातळीवर एकत्र येतात. एकमेकांना आधार देतात. एकमेकांच्या दु:खात सहभागी होतात. एकमेकांची

अपुरी राहिलेली भूक पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. कालिंदी अत्यंत सोशिक व संयमी आहे. तिच्या जीवनात कितीही बिकट प्रसंग आले तरी ती अत्यंत शांततेने, संयमाने त्यावर मात करते व स्वत:च्या जीवनाला वेगळे वळण लावून घेते. पतीवर श्रध्दा असणाऱ्या या स्त्रीची तिच्या भावनांची आपल्या नवऱ्याकडून अवहेलना झाली. तरीही ती या घटनेशी, परिस्थितीशी अत्यंत संयमाने तोंड देते व पतीपासून कोणतीही अपेक्षा न ठेवता विभक्त होते व नोकरी करून आपले जीवन एकटी जगू लागते.

कालिंदी आपल्या मनाच्या वाटेनी जात असते. अत्यंत अलिप्त जीवन जगणाऱ्या या स्त्रीला परिस्थितीच कणखर बनविते. परिस्थितीमुळेच तिचे परप्रांतिय, परसंस्कृतीय विवाहित पुरुषाशी प्रेमसंबंध येतात. भारतीय संस्कृतीत असे संबंध प्रस्थापित करणे, संबंध ठेवणे गैर मानले जाते. कालिंदी भारतीय नारी आहे. उच्च समाजातील, पाश्चात्य संस्कृतीचा प्रासंगिक सहवास लाभलेली असल्यामुळे तिला असे संबंध ठेवणे, प्रस्थापित करणे, गैर वाटत नाही. पतीवर श्रध्दा असलेल्या परंतु त्याला तिची कदर नसल्याने तिची अवहेलनाच केली गेली. परंतु ती अत्यंत संयमाने हे सर्व सहन करून आपल्याच जीवनाला एक वेगळे वळण देते व स्वकर्तृत्वावर जगू लागते. अशा या बंडखोर नायिकेचे चित्रण अत्यंत अलवार व अलिप्तपणे लेखिकेने केले आहे.

"देणं"[४] या कथेची नायिका "अनिता" ही मूळची अमेरिकन, उच्चशिक्षित, सुस्वरूपी, श्रीमंत कुटुंबातील स्त्री, "साजनसिंग" हा भारतीय. शिक्षणाच्या निमित्ताने तो अमेरिकेला जातो व अनिता ही त्याच्या बुध्दिमत्तेवर भाळते. या प्रगत देशातील या स्त्रीने साजन सिंगच्या परिस्थितीविषयी काही माहित नसताना ती त्याच्याशी विवाहबध्द होते.

अनिता ही कर्तृत्ववान, स्वतंत्र व मुक्त विचारसरणीची आहे. तिच्या जीवनाची नीतीमूल्ये वेगळी, भिन्न आहेत. संस्कार भिन्न आहेत. तिला

आताच मूल नको असताना तिला दिवस जातात तेंव्हा ती हा गर्भ बिन-दिक्कतपणे पाडण्याचा विचार साजनजवळ बोलून दाखविते. ती म्हणते, "मला माझे करिअर घडविणे, व्यक्तिमत्वाचा विकास करणे महत्वाचे आहे. तुझ्या देशात स्त्रीला मुलं पैदा करण्याचं यंत्र समजत असतील पण मला मुलं हवं की नको व ते केंव्हा होऊ द्यायचे हे सर्वस्वी मी ठरवणार आहे." (पृ.क्र. ९८) हे तिचे सडेतोड व परखड विचार ऐकून आपल्या मनात धस्स होते. ती स्वत:च्या विचारमूल्यापासून ढळत नाही. पती म्हणतो म्हणून हे स्वीकारायचे हे तिला अमान्य आहे आणि हेच तिचे बंडखोर व्यक्तिमत्व आहे. पण अनिताची बंडखोरी व तिची जीवनाची नीतीमूल्ये, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती भिन्न आहे याची प्रचिती येते. परंतु त्याच दिवशी साजनचा अपघातात जेंव्हा मृत्यू होतो तेव्हा अनिताच्या या गंभीर विचारात परिवर्तन होते.

इथे तिचे एक वेगळेच रुप दृष्टिट्पतास येते. तिचा गर्भ पाडण्याचा विचार बदलतो. तो गर्भ ती जोपासते व पिटरला जन्म देऊन ती साजनचा वंश वाढविते. जेव्हा तिला साजनच्या अपघाताची भरपाई म्हणून पाच आकडयाचा सरकारी चेक येतो तो चेक घेऊन ती साजनच्या वडिलांना भेटायला दिल्लीला येते. एकंदर परिस्थिती पाहून विचलित होते. साजनचे मायदेशी न परतण्याचे कारण समजते. एक नामवंत डॉक्टर असलेल्या साजनच्या वडिलांची परिस्थिती पाहून त्या विषयी ऐकूण तिचे मन अत्यंत भावनाविवश होते. या सडेतोड विचारसरणीच्या बंडखोर नायिकेचे चित्रण गौरी देशपांडयांनी अत्यंत तटस्थपणे केलेले आहे.

सोना : "विवाहबंधन न मानता लग्नाशिवायच राम बरोबर राहाणारी स्त्री."

पाश्चात्य विचाराप्रमाणे आपल्याला भावलेल्या व्यक्तीवर प्रेम

समर्पित करूनही परंपरेची कोणतीही वैवाहिक बंधने न स्विकारता प्रियकर (पती) याला स्वत:च्या जबरदस्त अशा सखोल विचाराने समजावून घेऊन स्वत:च्या जीवनाशी तडजोड करणारी शांत व संयमी पण बंडखोर स्त्री. हे बंड तसे तिला कोणालाही सांगता येत नाही. हे फक्त तिच्या अंतरातच पेटलेले आहे. स्वत:ला जाळत ठेवणारी आणि कमीत कमी जाळता येईल म्हणून अधिकाधिक कामाचा व्याप वाढवून घेणारी ही स्त्री. येथे आणखी एका बंडाचा विचार व्यक्त होतो. तो म्हणजे, धार्मिक विधी असेल, परंपरेने लग्न करणे असेल त्या त्या देशाप्रमाणे जे कांही करायचे असेल ते. परंतु ही स्त्री इतकी परिपक्व आणि विचाराने पुढे गेलेली आहे की, ती ही सारी बंधने तोडून देते. लग्न म्हणजे तिच्या दृष्टीकोनातून आयुष्यभर केलेले नितांत-रमणीय प्रेम. हा तिचा अर्थ आहे. असेच जर प्रेमच करायचे असेल तर लग्नच कशाला ? कोणत्याही परंपरेतून येणा-या रूढींना न स्वीकारता "प्रेम" या एकाच शब्दासाठी आणि "प्रेम" या एका शब्दातच विवाहाच्या कल्पना पहाते. यातच समाजाची सर्व नीतीमूल्ये पहाते. तिच्या दृष्टीकोनातून हा एकच विचार असतो आणि इतरांच्या, वाचकांच्या विचारातून मात्र हे एक जबरदस्त बंडच असते.

"ओहोटी"[5] या कथेची नायिका सोना सुस्वरूप, सुशिक्षित व नोकरी करणारी आहे. सोना व राम सामाजिक रूढीप्रमाणे विवाह न करताच एकत्र रहात असतात. समाजाने मान्य केलेल्या विवाहानेच पती-पत्नी म्हणून एकत्र राहिले पाहिजे हे तिला मान्य नाही. तर एकमेकांच्या विचाराने, प्रेमभावनेने एकत्र राहण्यात तिला वावगे वाटत नाही. ती विवाहापेक्षा प्रेमाला, प्रेम-भावनेला महत्व देते. सामाजिक आडाखे मोडून ती बिनधास्तपणे रामबरोबर एकत्र राहू लागते. पण राम हा केवळ वरवर आधुनिक वाटणारा पुरूष. त्याला सोनासारखी सामर्थ्यशाली स्त्री पत्नी म्हणून फार काळ भावत नाही.

तो सोनाला न सांगता दुस-या एका स्त्री शी लग्न करतो. खरं तर सोनाचा या विषयी अजिबात आक्षेप नसतो. रामने असे का केले याचा तिला उलगडा ही होत नाही. जेव्हा तिला ही बातमी, तिच्या मैत्रिणीकडून कळते तेव्हा तिला याचे कुतुहल वाटते व ती अगदी शांतपणे, संयमाने आपल्या या सा-या नात्यांचा फेरविचार करते व कोणत्याही प्रकारचा त्रागा न करता, रामला याचा जाब न विचारता स्वत:च्या दिनक्रमात बदल घडवून आणते. प्रियकर आपल्या हातून निसटून जात असतानाही ती अत्यंत संयमाने राहते. ती तर्कशुध्द विचार करणारी, मुक्त व स्वैर जीवन जगू पाहणारी, निर्भिड व स्व ला जपणारी बंडखोर नायिका आहे. गौरी देशपांडयांनी या बंडखोर स्त्रीचे चित्रण अत्यंत तटस्थपणे व परिणामकारकपणे केलेले आहे.

## १.१ गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातील पारंपरिक मूल्ये स्वीकारणारी स्त्री :

गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाङ्‌मयातील स्त्रिया या बंडखोर स्त्रीया आहेत. परंतु त्यांचे बंड उठून दिसावे म्हणून पार्श्वभूमीवर पारंपरिक पध्दतीचे जीवन जगणारी, कुचंबणा झालेली स्त्री ही त्यांच्या कथांमध्ये आढळते.

विभावरी शिरुरकर यांनीही "कळयांचे नि:श्वास"[६] मध्ये प्रौढ कुमारी-कांच्या समस्येचे चित्रण, कुचंबलेल्या स्त्रीचे चित्रण केले आहे. उदा. "बाबांचा संसार माझा कसा होईल ?" "त्याग", "अंत:करणाचे रत्नदीप", "रिकाम्या काडयांचे निनाद" वगैरे. परंतु विभावरीबाईंचा समस्या मांडणे हाच उद्देश असल्यामुळे ते चित्रण अधिक ठळक झाले आहे. या चित्रणामध्ये समस्येच्या तर्क-शुध्द स्वरुपाऐवजी भावनिक अंगालाच अधिक महत्व दिलेले दिसून येते. गौरी देशपांडे यांच्या साहित्यामध्येही कुचंबलेल्या स्त्रियांचे चित्रण आठवून येते. परंतु ते चित्रण "कळयांचे नि:श्वास" मधील स्त्रियांच्या चित्रणापेक्षा वेगळे आहे.

त्यांच्या कथांतील बंडखोर नायिकांची बंडखोरी उठून दिसण्यासाठी पारंपरिक मूल्ये स्वीकारणाऱ्या स्त्रीयांचे चित्रण लेखिकेने केलेले दिसते.

गौरी देशपांडयांच्या सर्वच कथा स्त्रीप्रधान आहेत. त्यांच्या कथांतून अनेक प्रकारच्या स्त्रिया भेटतात. त्यांची प्रत्येकीची खास अशी कांही तरी वैशिष्टयपूर्णता त्यांच्या चित्रणातून दिसून येते. गौरीबाईच्या कथांतील स्त्री ही इतर मराठी कथांतून, कलाकृतींतून भेटणाऱ्या स्त्रीयांपेक्षा वेगळया वेहऱ्या-मोहऱ्याची, वेगळया वळणाची, स्वतंत्र व मुक्त जीवन जगू पाहणारी निर्भीड व बाणेदार आहे, बंडखोर आहे. "स्व"ला जपणारी, "स्व"वर प्रेम करणारी, आपल्या मनाच्या वाटेने जाणारी बंडखोर स्त्री गौरीबाईच्या अनेक कथांतून भेटते. तसेच कांही पारंपरिक मूल्ये स्वीकारणाऱ्या स्त्रीया ही त्यांच्या कथांतून भेटतात.

<u>मधुराबाई</u> : "कृत्रिम सामाजिक संकेतामुळे स्वाभाविक भावना आक्रमून गेलेली स्त्री."

"याच्यासाठी" ७ या कथेची नायिका मधुराबाई यांनी वयाची चाळीशी ओलांडलेली आहे. मुले आता त्यांच्या बरोबरीला आलेली आहेत. पण त्यांना आता पुन्हा दिवस गेलेले आहेत. निसर्ग नियमाप्रमाणे ज्या घटना घडायच्या त्या घडणारच. माणसाने या घटनाक्रमासाठी स्वत:च्या व समाजाच्यादृष्टीने वयोमर्यादा ठरविलेली आहे. पण निसर्ग नियमाशिवायही माणसाने कांही निर्बंध घातले असलेले आपल्याला दिसतात. पण अशी एखादी घटना घडली की ती अवैध मानली जाते. या वयात मधुराबाईंना दिवस गेले म्हणजे फार विपरित घटना घडली असे नाही. परंतु भारतीय संस्कृतीचा पगडा, पारंपरिक मूल्ये स्वीकारणाऱ्या या मधुराबाईंनाच हे लज्जास्पद वाटते. त्या मनातून फारच खजिल झालेल्या आहेत. समाजात तोंड दाखविण्याचीही त्यांना लाज वाटते. खरे तर इतका संकोच बाळगण्याचे कांही कारण नसते. पण हिंदू

परंपरेने कांही विचार दिलेले आहेत. निसर्ग नियमापुढे मनुष्य कांही करु शकत नाही. स्त्री देहातील उन्मादक शारीरिक भावनेला ती शरण जाते. असे म्हणण्यापेक्षाही ती एका प्रकारची भूक आहे आणि ती भूक शमवत असताना हे घडते.

पण येथे एक जबरदस्त संघर्ष तिच्यापुढे उभा राहतो. तिला शरीराची भूक शमवायची होती. पण मूल नको होते. नको असलेले मूल तिला स्वीकारावे लागते. त्यामुळे तिच्या पुढे प्रश्न उभा राहतो. ती शरीराने आणि मनानेही पूर्ण कोलमडलेली आहे, नव्हे ढासळलेली आहे. रात्रंदिवस तिच्यापुढे एकच प्रश्न, जे घडले ते बरोबर नाही. पण नाईलाज, आणि अशा अतिशय भावनिक आणि परंपरागत नीतीमूल्यांना चिकटून बसणाऱ्या या स्त्रीची यातून मृत्यूनेच सुटका होते.

वत्सलाबाई : "कनिष्ठ वर्गातील स्त्री चे जीवन चित्रण"

वत्सलाबाई "जाग"[८] कथेची नायिका हिची समस्या वेगळयाच प्रकारची आहे. लेखिकेने समाजातील स्त्रियांचे केलेले अतिसूक्ष्म, अधिक खोल असे अवलोकन, त्यामुळे अनेक थरातील अनेक ताणतणाव घेऊन येणाऱ्या स्त्रियांचे दर्शन मनाला हेलावून सोडणारे अशाप्रकारचे आहे, हादरा देणारे आहे.

वत्सलाबाई ही पारंपरिक पध्दतीने जीवन जगणारी स्त्री आहे खरी. पण ती वेगळया स्तरातील स्त्री आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक या सर्व बाबतीमध्ये तिचा स्तर भिन्न आहे. निम्नस्तरीय सर्वसामान्य कुटुंबातील ही स्त्री खेडेगावात राहणारी, दोन मोठी मुले असलेली, प्रौढ, वैधव्य प्राप्त झालेली, दुसऱ्यांचे घरकाम करुन पोट भरणारी स्त्री, कामाच्या निमित्ताने ती मालकीणीच्या बहिणीच्या घरी मुंबईला येते, कामाची चतुराई आणि

आणि उरक यामुळे ती सर्वांना प्रिय होते. सर्वांचा विश्वास संपादन करते. तिने मुंबई पहावी म्हणून मालकीणीच्या मुलीला शाळेतून घरी आणण्यासाठी ती रोज जाऊ लागते. तेव्हा योगायोगाने तिला गोपाळ नावाचा पुरुष भेटतो. ती दोघे एकमेकांकडे आकर्षित होतात, त्यांचे प्रेमसंबंध जुळतात. जेव्हा मालकीणबाई तिला परत गावी जाण्याविषयी सांगते तेव्हा ती गोपाळला आपल्या बरोबर मालकीणबाईकडे घेऊन येते व मी आता येथेच यांच्याबरोबर, त्यांच्या झोपडपट्टीत राहणार आहे असे नि:संकोचपणे सांगते. मालकीणबाई चकितच होतात. तिला तू त्याच्याशी लग्न करणार आहे का ? तो तुला सांभाळेल का ? असे विचारल्यावर ती म्हणते, "अहो बाई त्यो केवढा मी केवढी ! आपलं ठेवील तितके दिवस ठेवील ! मग आहेच की पुन: .... !" वत्सलाने दिलेले हे उत्तर दिग्मूढ करणारे आहे. पण वास्तवस्पर्शी आहे.

वत्सलेला सर्व परिस्थितीची जाणीव आहे. ती विधवा आहे याचीही तिला जाणीव आहे. पण निसर्गाने शरीरामध्ये एक जबरदस्त भोग ओतलेला आहे. हा भोग निभवायचा कसा ? भोगाच्या कल्पना लग्नामुळे तिला आलेल्याही आहेत. त्यामुळे अशा स्त्रीला केवळ मनाचे समाधान असून चालत नाही. तर शरीराची इच्छाही पुरी करायची असते. ही इच्छा पुरी करत असताना लग्न याही शब्दाला महत्व नसते. झोपडपट्टी की घर यालाही महत्व नसते. महत्व असते ते फक्त शारीरिक इच्छेला. म्हणूनच ती बिनदिक्कतपणे सांगून जाते, तो लग्न करणार का याचा मी विचार केलेला नाही, तो ठेऊन घेणार का याचाही विचार करीत नाही. फक्त माझी इच्छा तो पूर्ण करतो ना बस्स ! मला तेवढेच हवे.

निसर्गाने शरीरामध्ये घातलेल्या या कामुक भावनांची परिपूर्ती होणे गरजेचे असते आणि यासाठीच ती त्याच्या झोपडपट्टीत रहायला तयार होते.

तसे पहाता ती विधवा आहे, प्रौढ आहे. विधवा म्हणून हे जरी तिला स्वीकारता येत नसले तरी शारीराच्या भुकेला मर्यादा घालून ती भुक मारणे तिला सहन होणारे नाही. ती एक करून दिलेली नैसर्गिक वाट आहे. म्हणून मालकीणबाईंनाही "आता ते मी तुम्हांला काय सांगू बाई!" असे सांगताना वत्सलेच्या सुरात एक तुच्छता उमटून गेली. ही तुच्छता याची आहे की, बाई तुम्ही सुखासमाधानाने राहता, तुमच्या शारीरिक भावना हव्या तेवढया शमविल्या जातात. मी ही स्त्री आहे. मलाही भावना आहेत. या भावना तिच्या उत्तरातून स्पष्ट होतात.

लेखिकेचे इथे एक जबरदस्त चिंतन आहे. विश्वामध्ये स्त्री मग ती श्रीमंत असेल, ज्ञानी असेल, कोणत्याही मोठया क्षेत्रातील असेल, गरीब असेल, भरडणारी असेल, झोपडपट्टीतील असेल किंवा काम करणारी असेल पण प्रत्येक स्त्रीला शारीरिक भावना या असतातच. तेथे श्रीमंती, ज्ञान, रूपरंग, धर्म आड येत नाही. कोणाकडून ? कधी आणि कोठे ? याला उत्तर एकच असते. फक्त ती स्त्री असते आणि तो पुरुष असतो. शारीरिक भावनेच्या पूर्तीसाठी येथे वयाचाही प्रश्न येत नाही, आणि स्तराचाही नाही. वत्सलेचे हे जे दुखणे आहे ते लेखिकेने अत्यंत मार्मिकपणे टिपले आहे आणि वत्सलेच्या व्यक्तिचित्रणातून ते या कथेत व्यक्त केले आहे.

<u>सिंधू</u> : "बंडखोर स्त्रीची स्वप्न बघणारी पण प्रत्यक्षात
पारंपरिक बंदिस्त जीवन जगणारी स्त्री."

गौरी देशपांडे यांच्या "राईट ऑन सिस्टर" [९] मधील सिंधू, हिची व्यक्तिरेखाही वेगळयाच प्रकारची आहे. ही विचाराने अधिक परिपक्व असल्याने आपला संसार आपण एकटीनेच सजविणे तिला अशक्य वाटत नाही. पती शिवाय संसार सजविता येतो अशी तिची धारणा असते. भारतीय संस्कृतीतील कुटुंबात सापडलेली असल्यामुळे आई-वडिलांच्या आग्रहास्तव तिला लग्न करावे

लागते.

दुर्भाग्याने तिला तिनही मुलीच होतात. भारतीय संस्कृतीत तर वंशाचा दिवा म्हणून मुलगाच हवा असतो. कुटुंबातील सर्वजण नकळत तिला छळत असतात. शिकलेल्या या स्त्रीच्या मनात यावेळी अनेक विचार येतात. आपल्या पतीला आपण आपला सारा देह दिला तरी तो आपल्यास समजून घेत नाही. मुलगी अथवा मुलगा होणे हे काहीही आपल्या हातात नसते. हे त्याला समजायला नको का ? हे तिचे भयानक दुःख आहे. हे दुःख परंपरेच्या मूल्यातून, दुसऱ्याचा विचार न केल्यामुळे जन्माला आलेले आहे. हे एक पुन्हा तिचे दुःख आहे.

पाश्चात्य देशातून आलेला तिचा दीर पाश्चात्य देशाच्या स्त्री स्वातंत्र्याच्या कल्पना सांगतो. ते ऐकून तिला वाटते की, आपणही अशी स्त्रियांची एक स्वतंत्र कॉलनी स्थापन करावी आणि पुरुष ज्या आरेरावीने वागतो आहे ते मोडून काढावे आणि त्यासाठी केलेल्या प्रत्येक कामाचे चार्ज वसूल करावे. तेव्हा तरी त्यांना आपली किंमत कळू शकेल. तिचा हा विचार मोलाचा व महत्वाचा आहे. पण हे वास्तवात आणता येत नाही. हे तिचे दुःख आहे. तिची ही कल्पना कल्पनेतच राहते. पुन्हा परंपरेने आलेल्या मूल्यांच्या जगातच इच्छा नसतानाही तिला वावरावे लागते. हे तिचे दुसरे दुःखच. तिचे स्त्री जातीवर अधांग प्रेम आहे. मुलीच झाल्या याचे तिला अजिबात दुःख नाही. तर उलट, "अष्टपुत्रीसौभाग्यवती भव" असा ही मला कुणी आशिर्वाद दिला तर मी त्याचा आनंदाने स्विकार करने हे तिचे विचार तिच्या स्त्री जीवनाकडे पाहण्याच्या उदात्त दृष्टीचे द्योतकच आहेत. अशा या शांत व संयमी सिंधूला मात्र पारंपरिक मूल्यंच स्वीकारावी लागतात. हे तिचे दुःख आहे.

आपण पुरुषांला जे शारीरिक प्रेम देतो त्याचे मूल्य वसूल करण्याची इच्छा निर्माण होणे हा विचाराचा एक नवा अंकुर आहे. किंबहूना कथेत जिज्ञासा निर्माण करणारा असाच.

चिमणी : "पारंपरिक जीवन जगणारी पण लबाड आणि कावेबाज स्त्री"

"कावळ्या चिमणीची गोष्ट" [१०] मधील चिमणी पारंपरिक पण लबाड, कावेबाजपणे आपल्या पतीला (चिमण्याला) बरोबर आपल्या ताब्यात ठेवते.

गौरीबाईंनी पक्षी जगतातील कावळा-चिमणी या पक्ष्यांच्या प्रति-काद्वारे एक सामाजिक समस्येचेच चित्रण केले आहे. समाजामध्ये अशा कांही स्त्रिया असतात की, आपला पती जरी बाहेरख्याली असला तरी तो आपला मतलब संपला की पुन: घरी परत येतोच. आपल्या विषयीचे जे त्याचे कर्तव्य आहे ते तो निमूटपणे पार पाडतो. तेंव्हा त्याने अन्य स्त्रीशी सलगी केली तरी पत्नी म्हणून असणारी स्त्री त्याच्या या गोष्टीकडे दुर्लक्ष करते.

तसेच चिमणीही आपल्या चिमण्याचे कावळीशी संबंध आहेत हे माहित असूनही ती त्याचा फार विचार करीत नाही. तर उलट कावेबाजपणे ती आपल्या नव-याला ताब्यात ठेवते.

पारंपरिकच पण लबाड, कावेबाज असणा-या स्त्रीचा नमुना चिमणीच्या रूपाने दिसतो.

पारंपरिक पध्दतीने जीवन जगणा-या स्त्रिया ह्या साळसूद असतीलच असे नाही, तर त्याही अप्रत्यक्षपणे व कावेबाजपणे, आपल्या मनाला भावेल तसे जीवन जगतानाची कांही उदाहरणे दिसतात.

१.२ नैसर्गिक रूपातील सौंदर्यालाच जोपासणा-या स्त्रिया :

गौरीबाईच्या कथेतील स्त्री ही सौंदर्यवती नाही. उलटपक्षी तिचे साधेपणा, सामान्यरूप, ओबडधोबडपणा, गबाळेपणा, याचेच वर्णन कथेत येते.

"सवय" [११] या कथेतील "मी" ही किडक्या दातांची, ओठ फुटलेले, अस्ताव्यस्त केस, बसलेली गालफड, कडा काळया झालेले डोळे, टोकरलेल्या पुटकळया असणारी अशी आहे. ती अशी असली तरी पुरुष तिच्याकडे आकर्षित होतात. तिचा असा बाणा आहे की, दुस-याला चांगले दिसावे म्हणून, आवडावे म्हणून का चेह-याची रंगरंगोटी करावी ? निटनेटके रहावे ? ती बाहयरूपाला कृत्रिमतेने सजविण्याचा अजिबात प्रयत्न करीत नाही.

"मध्य लटपटीत" [१२] मधील स्त्री ही अत्यंत बेपर्वाईने वावरणारी, स्वत:ला जपणारी, आपल्या मनाच्या वाटेने जाणारी, निसर्गानेच दिलेल्या सौंदर्याला आहे त्याच स्थितीत ठेवणारी ही स्त्री म्हणते, "आरशात पाहिले तर चेह-यामोह-यात सौंदर्याचा मागमूसही नाही. तरी बरोबर सुंदर बायका घेऊन जाणारेही वळून माझ्याकडे बघतात. कारण माझ्यामध्ये एकच - माझ्या एकंदर अविर्भावात जी संपूर्ण बेपर्वाई असते ती." या तिच्या सौंदर्याच्या विचारावरुन तिला लाभलेल्या नैसर्गिक सौंदर्य देणगीतच दुस-याच्या डोळयांना आपल्या या नैसर्गिक व्यक्तिमत्वाने बरे वाटते हे पटते. शेवटी नैसर्गिक सौंदर्य हे चिरकाल टिकणारे असे असते, तर कृत्रिम सौंदर्य, (तात्पुरते असते) सौंदर्य प्रसाधनांचाच वापर करूनच सौंदर्यात भर घालण्याची आवश्यकता आहे हे ती अजिबात मान्य करीत नाही. तिचा मुक्तपणा हेच तिचे सौंदर्य आहे, आणि सौंदर्यापेक्षाही महत्वाचे आहे ते तिचे "स्त्रीपण", तिची जीवन जगण्याची स्वतंत्र रीत.

अशाप्रकारे गौरीबाईंनी स्त्री सौंदर्याविषयीच्या पारंपरिक संकल्पनांना फाटा दिला आहे, आणि गौरी देशपांड्यांची नायिका ही मुक्त व स्वैर विचारसरणीची असल्यामुळे आपल्या मनाला जे भावेल, जे रूचेल तेच ती करते. इतरांच्या मनावर तिचे कांहीही अवलंबून नाही.

विभावरी शिरुरकरांच्या "कळयांचे नि:श्वास" [१३] मध्ये हिरिरीने, सुशिक्षित कमावत्या, प्रौढ कुमारीकांचा प्रश्न मांडला आहे. या प्रश्नाची

पुसटशी रेषा सुध्दा गौरी देशपांडयांच्या कथांत आढळत नाही. जणू कांही या तीस-चाळीस वर्षांमध्ये प्रौढ कुमारीकांचा प्रश्नच संपून गेला आहे किंवा या प्रौढ कुमारीका आपल्या आयुष्याकडे वेगळया दृष्टीने पाहू लागल्या आहेत असे म्हणावे लागेल.

गौरी देशपांडे यांच्या कथेतील स्त्री ही जीवनविषयक वेगळा दृष्टीकोन बाळगणारी आहे. स्वतःने सौंदर्यवती नाही. ती सौंदर्यवर्धनाचा प्रयत्नही करीत नाही. आधुनिक युगात नफाईदारपणा, चकचकीतपणा, ( Polishness ) ला अधिक महत्त्व आलेले दिसते. व्यक्तिमत्त्वाच्या बांधणीतून, व्यक्तीच्या जीवन व्यवहारातील वर्तणूकीच्या स्वरूपातूनही हे दिसून येते. त्याचाच एक भाग म्हणून कृत्रिम उपायांनी, सौंदर्यप्रसाधनांनी आपले सौंदर्य, व्यक्तिमत्व लोभसवाणे करण्याचा प्रयत्न होत असताना दिसतो. गौरी देशपांडे यांच्या नायिका असे करीत नाहीत. याचे मूळ लेखिकेच्या स्त्रीवादी भूमिकेत आहे. पुरुषाला आवडते म्हणून अथवा आवडावे म्हणून नटणे, मुरडणे म्हणजे जणू आपले दुय्यमत्व घोषित करणे असे स्त्रीवादी भूमिका मानते. गौरीबाईंच्या कथात्म साहित्यातील स्त्रिया या भूमिकेतून निर्माण झाल्यामुळे प्रचलित पुरुषप्रधान व्यवस्थेतील "नटणे" नाकारून त्या त्या संबंधीच्या बेफिकीरी दाखविताना दिसतात. त्या पेक्षा वेगळे असे आपले "व्यक्तिमत्व" सिध्द करण्याचा प्रयत्न करतात.

शिवाय लेखिकेचे असे एक चिंतन दिसते की, व्यक्तीच्या बाह्यसौंदर्यापेक्षा अंतरंगाचे सौंदर्य हे माणसाला ओढून घेणारे असते. अंतरंगाचे सौंदर्य हे माणसाला मोहून टाकणारे असते. अंतरंगाचे सौंदर्य म्हणजे त्या पात्रांच्या अंगी असलेले गुण. हे गुण वैचारिक संपन्नतेतून येत असतात. याचाच अविष्कार करण्याचा प्रयत्न केला आहे. आपली पात्रे उभी करीत असताना ती इतरांच्या पेक्षा वेगळी असली पाहिजेत, म्हणून सौंदर्याच्या वेगळ्या जाणिवा जोपासल्या

असाव्यात. याच्यातून एक घडले की, परंपरेतून चालत आलेल्या सौंदर्याच्या कल्पनांना त्यांनी धक्का दिला. किंबहुना त्यांच्या कथा म्हणजेच मराठी साहित्यातील कथांना मिळालेले एक वेगळे वळणाच आहे. मग सौंदर्यचित्रणाने दिलेल्या या हाद-याचे आश्चर्य मानण्याचे कारण नाही.

गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यात भारतीय (पौर्वात्य) आणि पाश्चात्य अशा दोन्ही संस्कृतीतल्या स्त्रीया भेटतात. कांही पाश्चिमात्य व्यक्तींचे व्यक्तीचित्रण करून पाश्चिमात्य संस्कृतीची ओळख, पाश्चिमात्य विचारसरणी, व्यक्तीची जीवनमूल्ये, जीवन जगण्याच्या पध्दती, सामाजिक संकेत, रूढी-परंपरा या सर्वांचा परिचय त्यांच्या कथात्म साहित्यात त्या त्या देशातील व्यक्तींच्या व्यक्तीचित्रणाने गौरीबाईंनी केलेले आहे. त्यांच्या कांही कथांत पाश्चिमात्य स्त्रियाही भेटतात.

पाश्चिमात्य संस्कृती आणि भारतीय संस्कृती या दोन्ही संस्कृतीची मूल्ये ही अगदी भिन्न भिन्न आहेत. पाश्चिमात्य संस्कृतीत पूर्ण व्यक्तीस्वातंत्र्य आहे. याला जबाबदार वैचारिक खोली, विचाराची प्रगल्भ बैठक हे ही असू शकेल. त्यामुळे त्या व्यक्ती स्वत:च्या जीवनाकडे आणि इतरांच्या जीवनाकडे एका वेगळयाच दृष्टीने पहाण्याचा प्रयत्न करतात.

किंबहूणा त्या संस्कृतीतला बराचसा भाग म्हणजे आपल्या भारतीय संस्कृतीतील ती बंडखोरीच असते. त्या संस्कृतीचे आवडते विचार आपल्या संस्कृतीत बसू शकत नाहीत. जसे पती-पत्नी कौटुंबिक जिव्हाळयाने राहूनही दुस-याशी संबंध ठेवू शकतात पण आपल्या संस्कृतीमध्ये तन-मन-धन एकमेकाला समर्पित करणारे असे की, जे दोघे एकमेकांच्यासाठीच जगलेले आहेत. परस्त्रीकडे किंवा परपुरूषाकडे पाहणे हे इथे भयावह पाप मानले जाते. तर पाश्चात्य संस्कृतीमध्ये हे त्यांच्या संस्कृतीचाच एक भाग होऊ पहात आहे. त्यांच्या विचारातील आणि आपल्या विचारातील ही विसंगती किंवा हा विरोधाभास व्यक्तीमत्वांना

वेगळी रूपे देत राहतो. इतकेच नव्हे तर लेखिकेला या पात्रांचा बंडखोरीसाठी चांगला उपयोग करून घेता आला आहे.

प्राश्चात्य देशातील हा स्वातंत्र्याचा भाग स्वीकारीत असताना त्या ठिकाणच्या वैचारिक देवाण घेवाणीतून कळत न कळत हे त्यांच्या अंगवळणी पडलेले दिसते. लेखिकेच्या व्यक्तित्वामध्ये पाश्चात्य स्वतंत्र विचारांचाही परिणाम झालेला आहे आणि भारतीय संस्कृतीमध्ये त्या वाढलेल्या असल्यामुळे याचा एक फायदा इथे असा झालेला आहे की, वेगवेगळे विचार स्वीकारलेली पात्रे त्या निर्माण करू शकतात. वास्तवामध्ये उभे राहून आपले नित्याचे व्यवहार करु शकतात आणि हेही येथील वेगळेपण वाचकांना दिग्मूढ करणारे आहे. तात्पर्य, जवळ जवळ पाश्चात्य देशात नित्यनियमित जे घडत असते ते भारतामध्ये एक प्रकारचे बंड असते. हा भिन्न देशातील विचारातील फरक आहे.

पाश्चात्य विश्वामध्ये मुलगी जेव्हा आपल्या पायावर उभी राहते, स्वत:चा स्वत: विचार करु शकते, निर्णय घेऊ शकते, आई-वडिलांनी तिला पूर्ण स्वातंत्र्य दिलेले असते. हे स्वातंत्र्य भारतीय युवतीला मिळू शकत नाही. भारतीय स्त्री ही जन्मापासून लग्नापर्यंत अनेक बंधनांनी जखडलेली असते, आणि लग्नानंतर सासरच्या बंधनांनी जखडलेली असते. "जखडने" हेच तिच्या जीवनाचे, जन्माचे साध्य. पण पाश्चात्य देशात कळत नकळत स्वैराचारही येतो. या सगळ्या प्रवृत्तींना पूर्ण स्वातंत्र्य असते. आणि म्हणूनच पाश्चात्य आणि भारतीय युवतींमध्ये हा फार मोठा फरक पहायला मिळतो.

आपल्या भारतीय संस्कृतीत शारीरिक प्रेमाचे जे आकर्षण असते ते जास्तीत जास्त अबोलेपणाने ठेवले जाते. मुके असते. मग पाहणे, राहणे, फिरणे वगैरेसारख्या सर्वच गोष्टी, याला कारण भारतीय स्त्रीच्या मनावर ग्रंथांच्या, धर्माच्या, संस्कृतीच्या माता-पित्यांच्या मताने असा एक विचार

दिला जातो की, "पती हेच आपले दैवत आणि त्याच्याचसाठी आपण". त्यामुळे आपल्या पतीवर अथांग प्रेम करायचे हे सुध्दा भारतीय स्त्रीनेच. त्यामुळे भारतीय स्त्री ही पाश्चात्य संस्कृतीतील स्त्री पेक्षा वेगळी आहे.

आधुनिक विचार, आधुनिक शास्त्र यामुळे सर्वत्र क्षेत्रामध्ये प्रचंड अशी प्रगती पाश्चात्य राष्ट्रात झालेली आहे. तसेच माणसाला जन्म हा एकदाच लाभतो अशी त्यांची धारणा असल्यामुळे या जीवनात जे जे आपल्याला करता येते ते ते केलेच पाहिजे ही त्यांची प्रवृत्ती बनली आहे. आपल्यासारख्या पाप-पुण्याच्या कल्पना त्यांच्यात दिसत नाहीत. आपल्या संस्कृतीत अजूनही अंध:-श्रध्दा, परंपरेने आलेले विचार, जुनी मूल्ये आहेत. त्यामुळे त्यांच्या दृष्टीकोनातून आपण पाहू शकत नाही, विचार करु शकत नाही. गौरी देशपांडे यांनी भारतीय तसेच पाश्चिमात्य संस्कृतीतील स्त्रियांचे व्यक्तिचित्रण करुन त्यांच्यातील, त्यांच्या विचारातील बंडखोरी आपल्या लेखनातून साकार केलेली आहे.

गौरी देशपांडे यांच्या कथेतील स्त्री ही इतर मराठी कथांतून भेटणाऱ्या स्त्रियांपेक्षा अगदी वेगळया स्वभावाची, आधुनिक मनाची आहे. ती स्वयंभू आहे, मुक्त आहे. तिने स्वत:ला मुद्दामहून कोणात्यातरी जोखडातून मुक्त करुन घेतलेले नाही. तर "मुक्तपणा" हीच तिची सहज स्थिती आहे. तिची निष्ठा स्वत:वर, माझ्या मनाला जे वाटेल ते मी करणार हा तिचा बाणा आहे, तिचं जगण्याचं सूत्र आहे. तिच्या इच्छा आकांक्षा, सहज प्रेरणा, लालसा, भावना प्रमाण मानून ती जगते. त्याबद्दल तिला अहंकार नाही. तिच्यामते हे असच जगायचं असतं. यापेक्षा वेगळं जगणं असूच शकत नाही.

२) गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातील पुरुषांची चित्रणे :

गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनामध्ये भिन्न भिन्न स्वभावाच्या, भिन्न-भिन्न विचारांच्या, भिन्न-भिन्न आचारांच्या व्यक्ती आलेल्या आहेत.

पण त्यांच्या कथात्म लेखनाचे विशेष असे की, त्यांनी आपल्या कथा स्त्रीला केंद्रकल्पून लिहिलेल्या असल्यामुळे पुरुषांना त्यांच्या कथांमध्ये तितके प्राधान्य मिळू शकत नाही. स्त्रीयांचे व्यक्तिचित्र रेखाटत असताना त्या स्त्रीच्या स्वभाव रेखाटन करण्याच्या संदर्भामध्ये जेवढा काळ तो पुरुष आला असेल तेवढेच त्याचे दर्शन.

तरी सुध्दा त्यांच्या कथात्म साहित्याचे वाचन किंवा अवलोकन केल्यानंतर त्यांच्या कथात्म साहित्यात वेगवेगळ्या स्वभावाचे, वेगवेगळ्या प्रवृत्तीचे पाश्चात्य संस्कृतीतील काही पुरुष पात्रे आपल्याला भेटतात. त्यामध्ये काही चांगले मित्र म्हणून येतात, कांही फसवणारे पुरुष ही भेटतात, तर कांही पुरुषी वर्चस्व गाजवणारे पुरुषही दिसतात. त्याच बरोबर भावा-बहिणीसारखे प्रांजळ नाते निभावणारे पुरुषही त्यांच्या विविध कथांत भेटतात.

२.१ चांगले मित्र : - मित्र म्हणून येणा-या पुरुषांच्या व्यक्तीरेखा -

इथे मित्र या शब्दांला भिन्नलिंगी अर्थ स्पर्श नाही. स्त्री आणि पुरुष यांच्यातील मैत्री असा अर्थ आहे. चांगला मित्र आपल्या मैत्रिणीला कोणत्याही अपेक्षा न ठेवता आपल्या भावना बोलून दाखवितो. या ठिकाणी मैत्री म्हणजे एक विसाव्याचे ठिकाण असते. एकमेकांची दु:खे विसरण्याचे ठिकाण असते. एकमेकांना, एकमेकांच्या विचार देवाण-घेवाणीतून एक वेगळ्या प्रकारचे समाधान किंवा आनंद मिळतो. अशी मैत्री ही निकोप किंवा नितळ मैत्री असते. या नितळ मैत्रीमध्ये जगण्याचा एक वेगळाच आनंद प्राप्त होत असतो.

गौरी देशपांडे यांनी आपल्या कथात्म साहित्यात ज्याप्रमाणे कांही पाश्चात्य स्त्रीयांचे व्यक्तिचित्रण करुन पाश्चात्य संस्कृतीतील स्त्रीचे दर्शन घडविलेले आहे तसेच काही पुरुष व्यक्तींच्या व्यक्तीरेखा रेखाटन करुन पाश्चात्य

संस्कृतीतील पुरुषांचे दर्शन ही घडविलेले आहे. मैत्रीसारखे पवित्र नाते जोपासण्यासाठी जात, धर्म, वय, रंगरूप, देशाकाल किंवा संस्कृती यातील कोणतीही बाब आड येत नाही, तर तिथे मनाला प्राधान्य असते. भिन्न-भिन्न संस्कृतीतील स्त्री पुरूष यांच्यातही हे मैत्रीचे निकोप नाते अत्यंत प्रांजळपणे जोपासले जाते. हे गौरी देशपांडे यांच्या कांही कथातून पहावयास मिळते.

"तेरूओ" [१४] या कथेतील तेरुओ हा जपानी संस्कृतीतील पुरूष आहे. तर या कथेची नायिका ही भारतीय संस्कृतीतील स्त्री आहे. ती विवाहित आहे आणि तिचा पती बिजनेसच्या व्यवहारामुळे देशोदेशीचे भ्रमण करीत असतो. तेंव्हा ही नायिका आपल्या पतीबरोबर जेंव्हा जपानला जाते तेव्हा तिची तेरूओशी ओळख होते. ती तेरुओला पाहताक्षणीच आकर्षिली जाते. तेरुओचे लोभसवाणे रूप तिला मोहित करून टाकते. तेरुओ हा अतिशय सुंदर आहे, त्याचे डोळे हसरे आहेत, ओठ बाकदार आहेत, शरीर मजबूत आणि नितळ आहे, आणि पावलं नाजूकशी आहेत. वयाची पन्नाशी गाठत आलेला हा तेरुओ परकिय संस्कृतीतील असूनही तो एक चांगला मित्र म्हणून भेटतो.

तसेच "थांग" [१५] आणि "मुक्काम" [१६] या कथेत "दिमित्री" आणि "इयन" या दोन पुरुष व्यक्तीरेखा पाश्चात्य संस्कृतीतील,गौरी बाईच्या या कथातून भेटतात.

हस-या चेह-याचा, काळयाभोर डोळयांचा, मजबूत शरीरयष्टी लाभलेला, हसताना गालावर खळी पडणारा 'दिमित्री', तर लांबच्या लांब आणि सडपातळ चेह-याच्या हाडांवर कातडी ताणून बसलेली, कांही रंगव नाही असे भासणारे डोळे, बोलताना अगदी रोखून पहायची सवय, जरा एकीकडे मान झुकवून ऐकण्याची सवय असलेला 'इयन' दोघेही अमेरिकन आहेत. पण चांगले मित्रही आहेत.

२.२ "फसविणारे, आपमतलबी पुरुष" :

गौरी देशपांडे यांच्या कथांत जसे मित्र म्हणून कांही पुरुष व्यक्तीरेखा भेटतात तसेच स्त्रीयांना फसविणारे कांही आपमतलबी पुरुष सुध्दा दिसतात.

या ठिकाणी पुरुषाला स्त्री बद्दलची प्रचंड ओढ असते. पण हा ओढा शारीरिक प्रेमातून जन्माला आलेला असतो. या ठिकाणचे पुरुष उक्ती आणि कृती यांच्यामध्ये विसंगत पध्दतीने जगत असतात. सुरवाती-सुरवातीला आपल्या वागण्यातून स्त्रीला विश्वास देत असतात. जेव्हा तिचा पूर्ण विश्वास बसतो त्यावेळी शारीरिक प्रेमाच्या ओढीने तिच्याशी सलगी करणारे पुरुष म्हणजे फसवणारे पुरुष. या पुरुषांना शारीरिक प्रेमाचाप्रचंड ओढा असतो. आणि ह्या प्रेमासाठी ते कांहीही करायला तयार होतात. येथे ते चरित्र-चारित्र्याला महत्व देत नाहीत. तर फक्त शारीरिक भूक कशी शमविली जाईल हे ते पहात असतात.

"ओहोटी"[१७] मधील राम हा सुशिक्षित, आधुनिक विचार करणारा पुरुष. सोनासारखी सुस्वरूपी, सुशिक्षित, नोकरी करुन आर्थिक सहाय्य करणारी, आधुनिक विचाराची, स्वतंत्र व तर्कशुध्द विचार करणारी स्त्री प्रेयशी म्हणून त्याला लाभते. ती दोघे लग्न न करता एकत्र रहात असतात. राम कांही वर्ष सोनाबरोबर रहातो व नंतर तो तिला न सांगताच, गुपचुप एका दुस-या स्त्रीशी लग्न करतो. खरे तर रामने असे का केले यावर सोनाचा आक्षेप नाही. परंतु त्याने हे तिला न सांगता केले याचे तिला वाईट वाटते. हा वरवर आधुनिक वाटणारा पुरुष म्हणतो, "लग्नाची बायको घेऊन समाजात मिरविता येते. मात्र प्रेमाची बायको घेऊन समाजात वावरता येत नाही. यावरून त्याच्या संकुचित विचारांची प्रचिती येते व आपमतलबीपणाही स्पष्ट होतो. सामाजिक संबंधही जोपासायचे व प्रेमाचे संबंधही ठेवायचेत असे या रामचे वागणे आहे. त्याने दुसरे लग्न करुन सोना सारख्या त्याच्यावर जिवापाड

प्रेम करणाऱ्या, समाजाला न भिता, त्याच्या बरोबर कोणत्याही प्रकारचा लेखी करार न करता केवळ त्याच्यावर विश्वास ठेऊन तन-मन-धन त्याला समर्पित करणाऱ्या स्त्रीची एकप्रकारे अवहेलनाच करतो.

रामच्या व्यक्तिचित्रणातून वरवर आधुनिक विचाराचा वाटणारा पुरुष कसा पारंपरिक नीतीमूल्यांना चिकटून बसतो याचे उत्कृष्ट उदाहरण गौरीबाईंनी दिले आहे.

"सवय" [१८] मधील तो हडकुळा, लांब नाकाचा, हिरव्या डोळ्यांचा आणि उद्दाम पुरुष "मी" ला आपल्या नादी लावतो. दोघे एकमेकांच्या इतक्या प्रेमात पडतात, त्यांना एकमेकांची इतकी सवय झालेली असते की, एकमेकांशिवाय जगणेच त्यांना असह्य वाटते. परंतु या हिरव्या डोळ्यांच्या पुरुषाने "मी" शी लग्न न करता केवळ प्रेमळ प्रेमाचे संबंध ठेऊन विवाह मात्र दुसऱ्या कुणा स्त्रीशी करतो व मी ला अर्ध्या वाटेवर सोडून, न सांगताच निघून जातो. त्यांची "मी" ला इतकी सवय झालेली असते की, अक्षरश: तिला वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये न्यावे लागेल इथपर्यंत तिचे मानसिक संतुलन बिघडलेले असते. इतकी ती त्याच्या या प्रेमाच्या सवयीत अडकलेली असते. पण तो तिला फसवून निघून जातो.

"कावळ्या चिमणीची गोष्ट" [१९] मधील चिमणा हा बिचाऱ्या गरीब कावळीला फसवितो. या चिमण्याने आपली चिमणी असतानाही कावळीशी संबंध ठेवून तिचा हवा तसा उपभोग घेतलेला आहे. जेव्हा धो धो पावसाने तिचे शेणाचे घर वाहून जाते तेव्हा ती आश्रयाच्या आशेने चिमण्याकडे येते. चिमणा चिमणी त्यांच्या मेणाच्या घरात सुखरुप असतात. कोसळणाऱ्या पावसात कावळी दार उघडण्याची वाट पहात ताटकळत कांही वेळ उभी राहते व निमूटपणे आल्या पावली परत जाते. एका झाडाखाली आश्रय घेते. कालांतराने झाडाच्या फांद्या पसरतात व तिला भक्कम आसरा मिळतो ती तेथे

आपले स्वतंत्र घरटे बनविते. पुन्हा चिमणा तिच्याकडे येतो आणि तिला आपल्या घरी येण्याविषयी विचारतो. तेंव्हा कावळी गप्प रहाते.

कावळी आणि चिमण्याच्या प्रतिकाद्वारे गौरीबाईंनी समाजातीलच ही एक समस्या प्रतिकरुपाने मांडलेली आहे. जेंव्हा स्त्रीपासून आपल्याला हवा असलेला भोग, मतलब संपतो, त्याची पत्नी म्हणून जी स्त्री असते तिच्या संगतीत असताना प्रेमापोटी तन-मन-धन अर्पण केलेल्या स्त्रीकडे तो ढुंकुणाही पहात नाही व पुन: आपल्याला तिची आठवण, गरज वाटली की आपली शारीरिक भूक भागविण्यासाठी बिनदिक्कतपणे तिच्याकडे येतो हे एक पुरुषाचे रूपचे स्म गौरीबाईंनी कावळ्या-चिमणो या पक्षीजगातील प्रतिकांद्वारे रेखाटले आहे.

२.३ <u>वर्चस्व गाजविणारे पुरुष :</u>

गौरी देशपांडे यांच्या कथांत पुरुषी वर्चस्व गाजविणा-या कांही व्यक्तिरेखा दिसतात. आपली भारतीय संस्कृती पुरुषप्रधान संस्कृती आहे. म्हणजेच भारतीय संस्कृतीने पुरुषाला केंद्रबिंदू मानले आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे, आर्थिक नाडीनी पुरुषाच्या हातामध्ये होती, आजही ब-याच प्रमाणामध्ये आहे. कुटुंबामधील सर्व व्यवहार हे पैशावर चालत असतात. त्यामुळे पैसा मिळविणारा हा कुटुंबातील कर्ता पुरुष. आणखी एक कारण स्त्री ही शिक्षणाच्या संदर्भात पुरुषाच्या फार मागे राहिली. त्यामुळे ज्ञानामुळे विचारांची जी एक शक्ती प्राप्त होते ते तिला झाली नाही. त्यामुळे पुरुष म्हणेल ते वाक्य तिला प्रमाण मानावे लागे. तिसरे एक कारण भारतीय संस्कृतीमध्ये परंपरेने चालत आलेल्या ज्या रूढी प्रथा आहेत, जसे पती म्हणजे देव, पती म्हणजे सर्वस्व. त्यामुळे पतीच्या विरोधात उभी न राहणे हे एक कारण आणि चौथे कारण नियतीचे. नियतीने अनेक जबाबदा-या स्त्रीवरच लादलेल्या

आहेत. जसे गर्भधारणा तिच्याठिकाणी होते. गर्भ वाढविणे आणि जन्म दिल्यावर त्याचे संगोपन करणे. अशाप्रकारच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या येतात. म्हणजे नकळत तिच्यावर बंधने येतात. या सर्वांचा फायदा करून पुरुष स्त्रियांवर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करतात.

"धांग"[२०] व "मुक्काम"[२१] यातील नंदन हा कालिंदीचा पती चांगले व्यक्तिमत्व लाभलेला, बिझनेसमॅन असल्यामुळे आर्थिक परिस्थिती भक्कम, त्यामुळे इतर स्त्रियांशी संबंध ठेवणारा. कालिंदी भारतीय संस्कृतीतील स्त्री. भारतीय नारीने जसे पतीवर प्रेम करावे या संस्काराप्रमाणे ती त्याच्यावर मनापासून प्रेम करीत असते. पण पुरुषी अहंकार जपणारा नंदन चिडचिडया स्वभावाचा असतो. कालिंदीला तो सतत बावळट, कमी लेखत असतो. परंतु ती या सर्वांकडे दुर्लक्ष करीत असते व त्याच्या बरोबर रहात असते. अर्थात पती-पत्नी हे एक श्रेष्ठ नाते मानले जाते. इथे जे कांही असते ते दोघांचे असते. मात्र नंदन हे दोघांचे न मानता ते तुझे हे माझे अशा भाषेत बोलत असतो. परकेपणा बाळगत असतो. बारा-तेरा वर्ष नंदनची ही अरेरावी सहन करूनही जेंव्हा आपली नंदनला अजिबात गरज नाही याची खात्री होते तेंव्हा ती निमूटपणे त्याच्या आयुष्यातून निघून जाण्याचा व नोकरी करून आपले पुढील आयुष्य जगण्याचा विचार त्याला बोलून दाखविते तेंव्हा तो तिच्या मुस्काडीत मारतो व म्हणतो, "माझा मुंबईचा फ्लॅट आहे. तो मी तुला फक्त हवा तर सहा महिने देईन व नोकरी मिळेपर्यंत खर्चासाठी म्हणून एक हजार रुपये देईन फार तर." हे एक हजार रुपये नंदन सारख्या श्रीमंत व ऐय्याशी माणसाच्या दृष्टीने अगदीच किरकोळ आहेत. परंतु कालिंदीला ते डोंगराएवढे वाटतात. या मदतीचा प्रश्न फक्त कांही दिवसाचा असतो. याही पेक्षा पुढे जाऊन तो म्हणतो, "तुझा ते तळेगावचं झोपडीवजा घर आहे तिथं जाऊन रहा फार तर." आणि तो तिला परतीचे पैसेही देण्याचे नाकारतो. जेव्हा ती म्हणते, "मी हे पैसे इतरांकडून

घेतले तर तुझीच अब्रू जाईल." तेंव्हा तो परतीचे पैसे देतो. कालिंदी बरोबर लग्न करण्याचा त्याचा विचार गंमतीशीर आहे. तो म्हणतो, "मला सगळ्यांनी सांगितले, तू गरीब स्वभावाची, नव-याकडून कांही अपेक्षा नसणारी, घरकामात चोख, चटपटीत, म्हणून मी लग्न केलं तुझ्याशी. खेरीज एक काळा रंग सोडता दिसायलाही तशी वाईट नाहीस. कुणाशी तरी लग्न करायचच म्हंटल्यावर मग तुझ्याशी केलं. !" (पृ.क्र.१६४) या त्याच्या विचारातून पुरुषी आरेरावीचा उच्चांक व स्त्रीला नगण्य लेखण्याची वृत्ती दिसते.

"राईट ऑन सिस्टर" [२२] मधील सिंधूचा नवरा मध्यमवर्गीय कुटुंबातील हिंदू संस्कृतीतील पारंपारिक रुढीप्रथांना कुरवाळणारा स्त्रीविषयी अगदी संकुचितवृत्ती ठेवणारा, स्त्रिने चार भिंतीच्या आतलेच आपले विश्व सांभाळावे, उंबरठा ओलांडून इतर व्यवहारात मध्येमध्ये नाक खुपसू नये, अशा पुरोगामी विचार सरणीचा.ग्रॅज्युएट झालेल्या आपल्या पत्नीच्या भावना त्याने काहीही समजून घेण्याचा प्रयत्न केली नाही. दुर्दैवाने त्यांना तिला तीन मुलीच होतात. "मुलगी म्हणजे दुस-याचे धन आणि मुलगा म्हणजे वंशाचा दिवा" असे मानणा--या या नव-याला व कुटुंबातील सर्वांनाच सिंधूकडून मुलगा हवा असतो म्हणून तिचा नकळत छळ होत असतो. मुलगा अथवा मुलगी हे कांही त्यांच्या हातात नसते. मात्र या दुषणांना जबाबदार म्हणून बव्हंशी सिंधूलाच धरले जाते, तिचा व तिच्या मुलींचा नकळत छळ होत असतो. सिंधूला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसते. उलट आपले तन-मन-धन सर्वस्व अर्पण केलेल्या नव-याची अरेरावी मात्र तिला सोसावी लागते.

## २.४ जिवलग प्रियकर :

गौरी देशपांडे यांच्या कथांत कांही चांगले प्रियकर भेटतात. प्रियकर आणि प्रेयशी याचा अर्थ असा, एकमेकांनी एकमेकांना समजावून घेणे आणि

सांभाळणे. येथे चांगले प्रियकर याचा अर्थ असा घेता येईल की, जो आपल्या प्रेयशीला समजावून घेईल मग ते तिच्या विचारांचे असेल, भावनेचे असेल, म्हणजेच तिच्या मनाच्या विरोधात, विचारांच्या विरोधात कांहीही न करणे. किंबहूना तिला आवडेल व रूचेल अशा पध्दतीने वागणे हे चांगल्या प्रियकराचे लक्षण. असा प्रियकर हा संयमी, शांत आणि परिपक्व विचार सरणीतून विचार करीत असतो. गौरी देशपांडयांच्या कांही कथांतूनही असे प्रियकर दिसतात.

"एकेक पान गळाव्या" [२३] मधील उंच, धिप्पाड शारीरयष्टीचा फरह्द हा माधवचा मित्र. फरह्द आणि माधव या दोघांचेही राधावर प्रेम असते. पण नियतीला राधाचा विवाह माधवशी मान्य असल्यामुळे फरह्दला मात्र केवळ प्रियकर या भूमिकेतच रहावे लागते. त्यानेही राधावर अंत:करणापासून प्रेम केलेले असते, म्हणून तो राधाच्या विवाहानंतर स्वत: आजविन अविवाहीत राहून राधाच्या आठवणींनाच कुरवाळत राहतो. राधाचे प्रेम जोपासत आपले जीवन जाळीत राहतो. राधाही त्याच्याशी प्रेमसंबंध ठेवीत असते. यांच्यातील हे निखळ प्रेम प्रारंभापासून तापर्यंत आहे तसेच रहाते. दोघे एकमेकांच्या दु:खात समभागाने/बरोबरीने सहभाग घेत असतात. जेंव्हा माधवचा मृत्यु होतो तेंव्हा मुले असतानाही राधा फरह्दची वाट पहात असते, की ज्यामुळे त्याच्या खांद्यावर मान टाकून आपले दु:ख विसरता येईल आणि राधा जेंव्हा पन्नाशी ओलांडलेली विधवा होते तेंव्हाही तो तिला पुनर्विवाहाची मागणी घालतो. पण राधा विवाह न करता तसेच प्रेमाचे संबंध ठेऊन चांगले मित्र म्हणून राहण्याचेच मान्य करते. आणि फरह्द सारखा सर्वसंपन्न पुरूष आपल्या प्रेयशीच्या आठवणीत अविवाहित राहून आपले आयुष्य जगतो. हे एक चांगल्या आणि निखळ प्रेमाचे उदाहरण गौरीबाईनी फरह्दच्या व्यक्तीचित्रणातून केले आहे.

"थांग" [२४] आणि "मुक्काम" [२५] मधील दिमित्री अमेरिकन पुरूष. बळकट शारीरयष्टी, बोटीचा इंजिनिअर, आर्थिक परिस्थितीने भक्कम व

अंगोलीकी सारखी अतिशय सुंदर ग्रीक पुतळयासारखी पत्नी लाभलेला हा पाश्चात संस्कृतीतील पुरुष. कालिंदी सारख्या रंगाने काळ्या-सावळ्या भारतीय स्त्रीच्या प्रेमात पडतो. याचे कारण कालिंदी जरी काळी असली तरी तिचं अंतरमन अतिशय प्रांजळ आहे. ती मनाने अतिशय सरळ, शांत, सोशिक आहे. परंतु आपला पती "नंदन" कडून दुखावली गेलेली आहे. अंगोलीकी आणि दिमित्री हे ही पती-पत्नी आपल्या संसारात एकमेकांवर खुश नाहीत. तेव्हा दिमित्री आणि कालिंदी या दोन परस्पर भिन्न संस्कृतीतील शिवाय दोघे हे विवाहित असूनही एकमेकांच्या प्रेमात पडतात. एकमेकांना आपले सर्वस्व मानतात व एकमेकांच्या दु:खात सहभागी होतात.

प्रेम हे कुणी ही कुणावरही करावे. इथे ना वयाची, ना जाती-धर्म, ना रूप-रंग या गोष्टीला महत्व असते. इथे फक्त अंतरमनाला महत्व दिले जाते. दिमित्री हा एक चांगला प्रियकर आहे. त्याला जीवघेणा अपघात झालेला असतानाही तो केवळ कालिंदीच्या आठवणीवर, कालिंदीसाठी या कठीण अपघातावर मात करुन त्यातून सावरतो, जगतो. कालिंदीही आपल्या नवरा नंदनची आठवणही काढत आपला प्रियकर दिमित्रीला भेटायला सातासमुद्रापलिकडे "ग्रीस" ला जाते. ही एकमेकांबद्दलची प्रियकर-प्रेयसीची आंतरिक ओढ मन हेलावून जाते.

"चंद्रिके ग सारिके ग" [२६] मधील अमेरिकन संस्कृतीतील आकर्षक व्यक्तीमत्व लाभलेला उंचापुरा, गोरापान, उच्चविद्याविभुषीत डॉ. मिचेल हॅंडर्सन संख्याशास्त्राचा डॉक्टर, सुहास भारतीय संस्कृतीतील स्त्री. पीएच्.डी. संपादन करण्यासाठी अमेरिकेला जाते तेव्हा मिचशी मैत्री होते, प्रेमसंबंध जुळतात. ते इतके दृढ झालेले असतात की एकमेकांशिवाय क्षणभर ही राहणे अवघड होते. पण जेंव्हा पीएच्.डी. पदवी प्राप्त होते तेंव्हा ती या नाजूक संबंधाचे पाश पूर्णत: तोडून भावंडाच्या, आई-वडिलांच्या व मालविकाच्या

ओढीने परत येते. तिचा परतीचा विचार ऐकून भेदरलेला मिचेल अक्षरशः रडतो. तिला तिच्यानिश्चयापासून परावृत्त करण्याचा अटोकाट प्रयत्न करतो. परंतु ती आपल्या निश्चयापासून ढळत नाही. ती मायदेशी परतते. मिचेल सुहासच्या संगतीत घालविलेल्या आठवणींना कुरवाळत राहतो. कांही दिवसांनी तो एका अमेरिकन मुलीशी लग्न करतो. मात्र दोनच वर्षात अमेरिकन संस्कृतीतील पंचवीस टक्के अयशस्वी होणाऱ्या विवाहाप्रमाणेच यांच्याही विवाहाची अवस्था होते आणि तो पुन्हा सुहासला भेटायला भारतात येतो. सुहास अजून तशीच असते मात्र तिने मिचेलला आवडणारे तिचे लांबसडक केस कापून टाकलेले पाहून त्याला वाईट वाटते. मिचेल मोठया आशेने तिला आपल्याबरोबर अमेरिकेला चलण्याविषयी विनंती करतो. पण ती तयार होत नाही. तो पुन्हा निराश होऊन परततो, व तिच्या आठवणीतच जगण्याचे ठरवितो. असा हा ही एक प्रियकर गौरीबाईंनी अत्यंत तटस्थपणे चित्रित केलेला आहे.

"तेरुओ"[२७] या कथेतील जपानी संस्कृतीतील हसऱ्या डोळयांचा, बाकदार ओठ असलेला, नाजुकशी पावलं आणि मजबूत नितळ शरीर लाभलेला, पहाता क्षणीच भुरळ पाडणारा, विवाहित, दोन मुलींचा बाप असलेला तेरुओ. तेरुओची नायिका नवऱ्या बरोबर जेंव्हा जपानला जाते तेंव्हा तिची तेरुओशी भेट होते आणि ती त्याच्या लोभस रुपावर भाळते आणि त्याच्या प्रेमात पडते. ती देखिल विवाहित आहे. चांगले व्यक्तिमत्व लाभलेला आणि श्रीमंत, आधुनिक विचार करणारा तिच्यावर प्रेमही करणारा पती तिला लाभलेला असताना आणितेअरुओही विवाहित आणि दोन मुलींचा बाप असलेला. चांगली पत्नी लाभलेली अजून आपल्या संसारात ठीक आहे हे माहित असूनही ती केवळ त्याच्या रुपावर भाळते व त्याच्या प्रेमात पडते. इथे केवळ बाह्य शारीरिक आकर्षण आहे. विवाहाची बंधने दोघांनाही असताना ते झुगारुन देण्याइतके आकर्षण

दोघांत निर्माण होते आणि जपानमधील वातावरणात तिच्या जीवनात असलेला रीतेपणा भरणारा, जीव लावणारा, उत्कट, सुंदर, हवाहवासा प्रियकर तेरुओ भेटतो. तेरुओच्या स्वप्नभेटीमुळे नायिकेचं कोरडं वास्तव सुसह्य होते. तिचं रित मन रंगीत होऊन जातं. असा हा ही एक प्रियकर गौरी-बाईंनी रेखाटला आहे.

## २.५ निर्मळ नाती जोपासणारे :

गौरी देशपांडयाच्या कथात्म साहित्यात निर्मळ नाती जोपासणाऱ्या कांही पुरुष व्यक्तिरेखा दिसतात. येथे अपेक्षा कमी पण त्याग अधिक अशी इच्छा असते. आपल्या जीवनात येणाऱ्या स्त्रियांना सुखदु:खाच्या प्रसंगी मदत करीत राहणे, वेळप्रसंगी त्यांच्या मदतीला केव्हाही धावणे आणि हे करीत असताना कोणत्याही अपेक्षा न करणे, तिच्यामनामध्ये असल्या वागण्याने फक्त भक्तिभाव नाते निर्माण करणे एवढेच या पुरुषाचे कार्य असते.

"एकेक पान गळावया"[२८] मधील फरहद राधासाठी आजीवन अविवाहित राहुन अखंडपणे तिच्या सुखदु:खात सहभागी होतो. मैत्री हे नाते जोपासत असताना त्याने आपल्या आयुष्याचा पूर्ण त्याग केला आहे, आणि राधाचा चांगला मित्र हितचिंतक हे निर्मळ नाते आयुष्यभर जोपासत रहातो.

पती-पत्नी हे निर्मळ नाते जोपासणारा आधुनिक विचाराचा नवराही गौरीबाईच्या कांही कथांतून भेटतो. आपण असताना आपली पत्नी अन्य पुरुषांशी संबंध ठेवते याकडे समजूतदारपणे पाहणारा, अत्यंत समजूतदार, बायकोचं इतरजनांच्या प्रेमात पडणं कळू शकणारा, व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड न येणारा असा आहे.

## २.६ वडीलधारी पुरुष मंडळी :

गौरी देशपांडयाच्या बहुतेक कथांमध्ये एक तरी वडिलधारी व्यक्ती असते.

तिचा कथेच्या नायिकेवर प्रभाव असतो व तिचे व त्याचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असतात. नैसर्गिक भावनांना मुरड न घालता जगण्याचा प्रयत्न करते. अगदी शारीरिक भावनेच्या बाबतीतही, नातेसंबंधामधील हे लोभसवाणेपण दिसून येते. यात विश्वास, प्रेम त्याचबरोबर ओढही असते. या ओढीचे उदात्तीकरण न करता चित्रण करताना दिसतात.

ही व्यक्ती त्या स्त्रीपेक्षा वयानं बरीच मोठी, वृध्दत्वाकडे झुकणारी असते. या वृध्द, मायाळू माणसांना त्या स्त्रीच्या आयुष्यात गाढ स्थान आहे. त्यांचं आणि तिचं हे नातं गूढ आहे. वात्सल्य, माया, स्नेह आणि शिवाय स्त्री पुरुषातील उत्कट आकर्षण यांच्या संमिश्र छटा या नात्यांत रेंगाळताना दिसतात.

"तेरुओ" मधील "जी", कांही दूरपर्यंत मधील "ओरुनदा", "दुस्तर हा घाट" मधील नमूचे गुरुजी व नंतर सासरे झालेले दादा, "चंद्रिके ग सारिके ग" मधील "पॉल" या वृध्द माणसांना नायिकेच्या आयुष्यात गाढ स्थान आहे. त्याचं हे नातं गूढ आहे, त्यांच्यात उत्कट आकर्षण आहे. स्नेह आहे.

गौरी देशपांडे यांनी दोन स्वतंत्र व्यक्तिचित्रणे लिहिली आहेत. "गोरखची गोष्ट"[२९] या कथेत समज कमी असलेल्या एका मुलाचे चित्र लेखिकेने अत्यंत बारकाईने रेखाटले आहे. "गोरख निंबाळकर" हा प्रथम भेटीत लेखिकेला गुरखाच वाटतो. गोरख दहा बारा वर्षांचा असताना त्याची आई वारली व त्याच्या बापाने गोरखपेक्षा जेमतेम पाच सहा वर्षांनी मोठी दुसरी बायको केली. तेव्हापासून गोरखच्या हाल वनवासाला सुरुवात झाली.

लेखिकेच्या घरातील मोलकरीन नानीना गोरख विषयी आपुलकी होती. त्यामुळे त्या गोरखला आपल्या बरोबर वावरावर घेऊन येत. एकोणीस वर्षांचा गोरख बारा-तेराच वर्षांचा वाटे. जेव्हा त्याचे नाव मतदार यादीत

आले तेव्हा कळले की तो विशीचा आहे.

असा हा गोरख आपल्या स्वभावामुळे, कामामुळे आणि स्वत:च्या घरातून होणाऱ्या त्याच्या हेलसांडीमुळे मावशीला त्याची कीव आली आणि तो मावशींचाच गोरख बनला. निंबाळकर हे इथले राजघराणे. या राजघराण्यातील हा गोरख मावशींच्या घरची कामे करतो याची सर्वजण टर उडवित. पण तो अगदी साळसूदपणे म्हणतो, "त्यात काय झालं ? मावशी स्वत करतात की ही कामं ?" शिवाय त्याचा हातगुणही चांगला होता. त्याने लावलेले बी फुटून यायचे, रोप फोफावायचे, झाड फुलायचे. यामुळे तो मावशींच्या अंगवळणी पडून गेला.

गोरख आठ-दहा एकर जमीनीचा एकुलता वारस होता. पण त्याच्या सावत्र आईला मुलगा झाला की ती गोरखचा काटा काढायला जराही कच खाल्ली नसती. तेव्हा त्याच्या चुलत्यांनीही गोरखची जबाबदारी मावशींवर सोपविली होती आणि मावशीही त्याच्यावर इतक्या जिवापाड प्रेम करीत होत्या की, त्या म्हणतात, "अहो मला तो न् त्याला मी ! सांभाळणारच आम्ही एकमेकांना !" यावरुन गोरख विषयीची अंत:करणाची ओढ स्पष्ट होते.

गोरखने तारुण्यात पदार्पण केले आणि निसर्गत: त्याच्या भावविश्वात बदल झाला. त्याला चांगले कपडे घालावेसे वाटू लागले म्हणून त्याने पगारातील तीस रुपये मावशींना आपल्या जवळच ठेऊन घेऊन आपैशातून मजबूत, निळ्या-रंगाची म्हणजे जीन्सची पँट घेऊन देण्याविषयी सांगितले तेव्हा मावशींनी कपड्यात त्याचे पैसे खर्च करण्यापेक्षा आपल्या मुलींच्याच पँट, शर्टस्, बूट-चपला दिल्या. ते पाहून तो खूप आनंदीत झाला आणि मावशीबरोबर पुण्याला गेला. तेथील बंगल्याचे वैभव पाहून तो खुष झाला आणि त्याने खूप मजा केली.

मावशी नानींबरोबर रिक्षातून भटकला, खास पुण्यात घालण्यासाठी दिलेली पांढरी पँट आणि शर्ट घुऊन, नानींकडून त्याच्यावर इस्त्री फिरवून

घेतली. मावशी बरोबर हॉटेलात जाऊन डोसा, वडा, सामोसा, बिर्याणी असे काय काय खाल्ले आणि गावी परततांना मावशींना त्याने, "बाब बाय मावशी" म्हणून निरोप दिला. त्याच्यातील हा बदल लेखिकेने अतिशय बारकाव्याने टिपला आहे, आणि आता तर त्याच्या आईला सा-या मुलीच झाल्याने तिने आता कुटुंब नियोजनचे ऑपरेशन करून घेतले आहे व गोरख आता स्वत:च्या मळयात काम करु लागला आहे. बाप व आई त्याला आता चांगले बघू लागले आहेत. तो मावशींना शंभर रुपये देऊन त्यांच्यासारखे गजराचे व तासातासाला वाजणारे घडयाळ मुंबईहून आणून देण्यास सांगतो. यावरुन गोरख आता समजूतदार झाला आहे आणि हा बदल लेखिकेने अचूकपणे टिपला आहे.

गोरखच्या व्यक्तिचित्रणातून लेखिकेचे ^त्यांच्या स्वभावातील तीक्ष्ण बारकावे अचुकपणे टिपण्याचे त्यांच्या हतोटीचा प्रत्यय येतो. गोरखच्या वर्णनातून गोरखचे व्यक्तिमत्व डोळयासमोर हुबेहुब उभे राहते. लेखिकेचे हे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे.

"नानींची नवलकथा"[२९] या कथेतील नानी म्हणजे, विंचुर्णीतल्या लेखिकेच्या घरात काम करणा-या "पार्वतीबाई अहिवळे". काळया, बुटक्या, अगदीच किरकोळ पण लखलखीत, आकर्षक, हसतमुख आणि लक्षात यावी इतकी स्वच्छता, जमेल तितकी केलेली छानछोकी उदाहरणार्थ हातभर सोनेरी नक्षीच्या बांगडया, कानात पितळी कर्णफुले वगैरे. हसताना त्यांचे पांढरेशुभ्र दात चमकत. अशा या नानी बौध्द (हरिजन) समाजातील होत्या. परंतु त्यांची स्वच्छता आणि कामाची उरक, निटनेटकेपणा यामुळे त्यांनी संपूर्ण घराचा ताबाच घेतला होता.

नानींना प्राण्या-माणसांची फारच माया होती. चाळीशीच्या या नानी पण पोरकटच वाटत. हसाय-बोलायची, विनोदांची, चेष्टा-मस्करीची

त्यांना आवड, त्यामुळे घरी येणाऱ्या पाहुण्याशावळयाला, मुलींना तर त्या लवकरच आपलेसे करीत. त्या उपास-तापास, सणवार अगदी श्रध्देने करीत होत्या.

आपल्या पेक्षा वयाने वीसेक वर्षांनी मोठया असलेल्या नवऱ्याचे त्या सरळ, न लाजता नावाने उल्लेख करुन त्याचे कौतुक करीत. नानींना सवत व सावत्र मुलही होते. परंतु त्या परिस्थितीतही नानी सुखी होत्या. नानीने लेखिकेचे मन जिंकून घेतले होते. नानी त्यांच्याबरोबर मुंबईला जाते व तेथील वैभव पाहून आनंदित होते. नानी मावशींना आपली आईच मानते.

नानी "कजाग, भांडखोर" म्हणून प्रसिध्द होत्या. पण मावशींनी त्यांना समज दिल्यापासून त्या सावरल्या. विचुणींत जातीयवाद अगदी घट्ट मुळे धरुन रुतलेला होता. नानी नवबौध्द, लेखिका उच्चवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील. पण लेखिकेच्या मनावर असे कांही संस्कार नाहीत त्यामुळे त्या नानींच्या हातचे जेवण खाणं घेतात आणि नवबौध्दांच्या हाल, अस्पृश्यांवरही लेखिका आपल्या परीने मदत करतात. नानीमुळे तर लेखिकेला या लोकांविषयी अधिकच कणव निर्माण झालेली आहे.

नानी अतिशय जिद्दी स्वभावाच्या आहेत. त्यांची अगोदर सोयरिक झालेली होती पण काही कारणाने ती मोडली आणि नंतर महादेवरांवासारख्या मध्यमवयीन, पोटाशी एक मूल असणाऱ्या बिजवराशी त्यांचे लग्न लावून देण्यात आले. पण त्यांनी मोठया जिद्दीने हा संसार करुन दाखविला, त्या म्हणतात, "मावशी, मी आधि भावानचा (सावत्र मुलगा) पत्कर घेतला, त्याला नीट समज आल्यावर माझ्या तीन मुली व मग हनमान . सगळयांना नीट ओळ लावून दिली. मुलींना चांगले नवरे बघून दिले, दोन-दोन मुलांत ऑपरेशन करायला लावली. आता हनमान

दहावी झाला. दाखवली की नाही जिद्द करून ? भाकरी-कालवण, सणवार, पै-पाहुणा, संसार, मुलंबाळं कशात कुणाला बोट दाखवायला जागा ठेवलीय का ? आता ते थकलं तर माझ्या जिवावर नाही चालवतीय सगळं ?" या त्यांच्या जिद्दी आणि निर्भिड वृत्तीतून नानींचे व्यक्तिमत्व आपसूक डोळ्यापुढे उभे राहते.

लेखिकेने "नानी" आणि "गोरख" यांच्या व्यक्तिचित्रणातून या व्यक्तींचा लेखिकेच्या जीवनातील सानिध्यातील, सहवासातील सूक्ष्म बारकावे टिपून ही व्यक्तिचित्रणे परिणामकारक, प्रभावी-होण्यासाठी त्यांना हवी असणारी भाषा, परिस्थिती व वातावरणाची पोषकता लेखिकेने आपल्या लेखनीतून प्रकट केली आहे. त्यामुळे ही व्यक्तिचित्रणे वास्तव व हुबेहुब डोळ्यासमोर उभी राहतात.

......

गौरी देशपांड्यांनी कांही कथांमध्ये तो, ती, मी अशी नांवे देऊन प्रतिकात्मक पात्रे उभी केली आहेत. नाव न देता उभी केलेले पात्र त्याच्या आचारविचारांचे प्रतिनिधित्व करीत असते. अशाप्रकारच्या रचनेने वेगवेगळे परिणाम होतात. एक म्हणजे विशिष्ट विचार ठसठशीतपणे प्रतिबिंबित होतो. पण त्याच बरोबर व्यक्ती भोवतीचा सामाजिक परिसर तोडला जाऊन व्यक्तिचित्रणं अधांतरी बनतात.

शरीर वैशिष्टये, रूप, रंग यांच्या प्रमाणेच जात, गोत, धर्म, आर्थिक परिस्थिती, समाजातील स्थान यासारखे सामाजिक परिस्थितीचे चित्रण गौरीबाईंनी केलेले नाही. भारतीय व्यक्तींचे जीवन हे रूप, रंग, जात, गोत, धर्म, समाजातील स्थान, आर्थिक परिस्थितीचे चित्रण ह्या गोष्टीनेच नियमित होत असते. गौरी देशपांडे आपल्या पात्रांना आडनांवही देत नाहीत. कांही व्यक्ती या महानगरातल्या आहेत. भारतीय महानगरात जात-पातीचे बंध थोडे पुसटसे झालेले दिसतात. महानगरीतल्या व्यक्ती दगदग, धावपळ, औद्योगिक संस्कृती यांचे प्रचंड ताण या व्यक्तींच्या मनावर असतात. त्यामुळे महानगरीय व्यक्तींचे जीवन मर्यादित झालेले असते. कोणाही व्यक्तीचे जीवन हे अवकाशात किंवा पोकळीमध्ये होत नसते, तर ते एका विशिष्ट सामाजिक चौकटीतच आकाराला येत असते. पण गौरीबाई आपल्या व्यक्ती रेखाटताना याचे भान राखत नाहीत. त्यामुळे त्यांच्या व्यक्ती या मुळे नसलेल्या वाटतात. त्यांच्या कथात्म वाङ्मयातील बंडखोर स्त्रियांचे बंड हे तितकेसे परिणामकारक होत नाही. याचे हे एक महत्वाचे कारण आहे असे म्हणावे लागते.

या कथात्म लेखनात लहान मुलाबाळांचे चित्रण (गंपू या अपंग मुलाचे व तिलोत्तमा आणि तुषार गोंधळकर या दोन लहान मुलांचे त्रोटक चित्रण वगळता), वृध्दांचे आणि वृध्दत्वाने गलितगात्र झालेल्या, अत्यवस्थ व्यक्तींचे चित्रणही त्यांच्या कथांत येत नाही. महानगरीतील सामाजिक परिसरही त्या चित्रित

करीत नाहीत. ही एक मोठी उणीव भासते. महाराष्ट्रीय समाजात आज जरी विभक्त कुटुंब पध्दती झालेली दिसत असली तरीही, वृध्दमाणसे या कुटुंबात असतातच. "वृध्दाश्रम" ही संस्था महाराष्ट्रात फारशी प्रचलित नाही. त्यामुळे सर्वसाधारण कुटुंबात आजी-मुलगी-नात, आजोबा-मुलगा-नातू अशा तीन पिढया दिसून येतात. असे हे महाराष्ट्रीय समाजातील कुटुंबामध्ये असलेले वातावरण येथे चित्रित झालेले दिसत नाही. म्हणून गौरी देशपांडे यांच्या कथांना महाराष्ट्राच्या कुटुंबकथा असे म्हणता येणे कठीण आहे.

## सारांश :

गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिचित्रणाचे स्वरूप वैशिष्टयपूर्ण आहे असे दिसते. व्यक्तिरेखांचा विचार करीत असताना स्त्रीला केंद्रकल्पूनच कथानिर्मिती केली असलेने स्त्री व्यक्तिरेखांनाच अधिक उठावदार-पणा व ठसठशीतपणा आलेला आहे. पुरुष व्यक्तिरेखा या धूसर, जेवढा काळ त्याचा संदर्भ असेल तेवढेच त्याचे दर्शन अशा स्वरूपात आढळतात. त्यांच्या कथांत वेगवेगळया स्वभावाच्या, भिन्नभिन्न विचारांच्या वेगवेगळया प्रदेशातील व्यक्तिरेखा भेटतात. त्यांच्या कथांत भेटणारी स्त्री ही बव्हंशी सज्ञान, वयाची विशी ओलांडलेली आहे. किशोरवयीन मुली, विशीच्या आतील अल्हड मुली, वृध्द बायांचे चित्रण कुठेही आढळत नाही. त्यांच्या नायिका ह्या "स्व" वर प्रेम करणाऱ्या "स्व"ला जपणाऱ्या, मुक्त जीवन जगू पाहणा--या, तर्कशुध्द विचार करणाऱ्या, परिस्थितीशी समायोजन साधणाऱ्या आहेत, निर्भीड वृत्तीच्या आहेत. बंडखोर आहेत.

"समाजाचे व कुटुंबाचे पारंपरिक संकेत झुगारून देणारी "राधा", "स्त्रिच्या जीवनातील पतीचे स्थानच प्रश्नचिन्हांकित करू पाहणारी सुहास",

"शारीरवासनाबाबत पारंपरिक संकेत मोडून, आपल्या मनाचा कौल घेऊन वागणारी कालिंदी", "विवाहबंधन न मानता लग्नाशिवायच राम बरोबर राहणारी निर्भीड सोना" या बंडखोर नायिकांचे चित्रण लेखिकेने अत्यंत अलिप्तपणे केले आहे.

या बंडखोर स्त्रीयांचे बंड उठावदार व अधिक ठसठसीतपणे होण्यासाठी म्हणून पार्श्वभूमीदाखल पारंपरिक मूल्ये स्वीकारणा-या कांही स्त्रीयांचे चित्रण-ही गौरीबाईंनी केले आहे. "कृत्रिम सामाजिक संकेतामुळे स्वाभाविक भावनाच आक्रसून गेलेल्या "मधुराबाई", "शारीरातील कामुक भावनांची परिपूर्ती होणे-साठी वय आणि परिस्थितीचे भान न राखणारी निम्नस्तरातील "वत्सलाबाई", "बंडखोर स्त्रीची केवळ स्वप्न बघणारी, परंतु बंदिस्त जीवन जगणारी "सिंधू", "लबाड व कावेबाज "चिमणी" अशा कांही कुचंबलेल्या स्त्रियांचेही चित्रण पार्श्वभूमीदाखल आलेले दिसते.

पारंपरिक सौंदर्याच्या कल्पनांना फाटा देऊन अंतरंगाचे सौंदर्य हे चिरकाल टिकणारे आहे. म्हणून साधे, सामान्य रूप, ओबडधोबडपणातही प्रभावी नैसर्गिक सौंदर्य असणा-या नायिका त्यांनी चित्रित केल्या आहेत.

या स्त्रियांचे रेखाटन करीत असताना त्या संदर्भात जितका काळ पुरुष येईल तितकेच त्याचे दर्शन. गौरी देशपांडयांच्या कथांत "मित्र म्हणून येणा-या व्यक्तिरेखा", "फसविणारे, आपमतलबी पुरुष", "पुरुषी व्यक्तिमत्व गाजवि-णा-या व्यक्तिरेखा", "चांगले प्रियकर", "निर्मळ नाती जोपासणारे पुरुष", "वडिलधारी, प्रौढ पुरुष व्यक्तीरेखा", "समजुतदार नवरा" अशा विविध प्रकारच्या पुरुष व्यक्तिरेखांचे चित्रण करून लेखिकेने कथानिर्मिती केली आहे.

परंतु सर्वच कथा ह्या स्त्रीप्रधान असलेने त्यातील स्त्रीव्यक्तिरेखाच अधिक उठावदार व प्रभावी झालेल्या आहेत आणि त्या अस्सल वाटतात.

गौरी देशपांडे यांच्या कथा प्राधान्याने कुटुंबकथाच आहेत. पती, पत्नी, मुले, पतीचे मित्र, पत्नीचे मित्र अशा व्यक्ति मिळून या कथा सिध्द होतात. म्हणून या कुटुंब कथा आहेत. परंतु असे असले तरी त्यांच्या कथांत लहान बालकं, वृध्द, पंगु, अंथरुणाला खिळलेली, गलितगात्र झालेली व्यक्ति-चित्रण आढळत नाहीत. खरं तर कथात्म साहित्य हे समाज जीवनाची अनुकृती असते, यथावत दर्शन घडवित असते. गौरी देशपांडयांच्या कथा हया कुटुंबकथा आहेत आणि महाराष्ट्रीय कुटुंबामध्ये लहान मुले, किशोरवयीन मुले आणि वृध्द, अंथरुणाला खिळलेली माणसे यांचा सरसकट वावर असतो. कुटुंबकथा असूनही त्यांच्या कथांमध्ये मुले आणि वृध्द माणसे येत नाहीत. ही एक महत्वाची उणीव वाटते.

मराठीतील यापूर्वीच्या कथांमध्ये प्रेमळ, आई त्यागी बहीण, हक्क गाजविणारे वडील, अधिकार गाजविणारा नवरा, छळ करणारे सासू-सासरे व इतर मंडळी अशा प्रकारच्या व्यक्तिरेखा आढळतात. उदा. साने गुरुजींच्या कथा, य.गो. जोशी, वगैरे. परंतु गौरी देशपांडयांच्या कुटुंबकथा असल्या तरी सुध्दा त्यातील व्यक्तींची स्वभावचित्रे मात्र पारंपारिक कथांपेक्षा वेगळी असलेली दिसतात.

.....

## प्रकरण तिसरे

### संदर्भसूची


१) देशपांडे गौरी - एकेक पान गळावया, मौज प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९८५.

२) देशपांडे गौरी - निरगाठी आणि चंद्रिके ग सारिके ग, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८७.

३) देशपांडे गौरी - मुक्काम, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९९२.

४) देशपांडे गौरी - देणं, आहे हे असं आहे, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८६.

५) देशपांडे गौरी - ओहोटी, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

६) शिरुरकर विभावरी- कळ्यांचे निःश्वास, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण, १९३४.

७) देशपांडे गौरी - याचसाठी, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

८) देशपांडे गौरी - जाग, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

९) देशपांडे गौरी - राईट ऑन सिस्टर, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

१०) देशपांडे गौरी - कावळ्या चिमणीची गोष्ट, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

११) देशपांडे गौरी - सवय, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

१२) देशपांडे गौरी - मध्य लटपटीत, एकेक पान गळावया, उपरिनिर्दिष्ट.

१३) शिरुरकर विभावरी- कळ्यांचे नि:श्वास, उपरिनिर्दिष्ट.

१४) देशपांडे गौरी - तेरुओ आणि कांहि दूरपर्यंत, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९८५.

१५) देशपांडे गौरी - दुस्तर हा घाट आणि थांग, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. जुलै, १९८९.

१६) देशपांडे गौरी - मुक्काम, उपरिनिर्दिष्ट.

१७) देशपांडे गौरी - ओहोटी, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

१८) देशपांडे गौरी - सवय, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

१९) देशपांडे गौरी - कावळ्या चिमणीची गोष्ट, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

२०) देशपांडे गौरी - दुस्त हा घाट आणि थांग, उपरिनिर्दिष्ट.

२१) देशपांडे गौरी - मुक्काम, उपरिनिर्दिष्ट.

२२) देशपांडे गौरी - राईट ऑन सिस्टर, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

२३) देशपांडे गौरी - एकेक पान गळावया, उपरिनिर्दिष्ट.

२४) देशपांडे गौरी - दुस्तर हा घाट आणि थांग, उपरिनिर्दिष्ट.

२५) देशपांडे गौरी - मुक्काम, उपरिनिर्दिष्ट.

२६) देशपांडे गौरी - निरगाठी आणि चंद्रिके ग सारिके ग, उपरिनिर्दिष्ट.

२७) देशपांडे गौरी - तेरुओ आणि काहि दूरपर्यंत, उपरिनिर्दिष्ट.

२८) देशपांडे गौरी - ऐकेक पान गळावया, उपरिनिर्दिष्ट.

२९) देशपांडे गौरी - गोरखची गोष्ट, मौज प्रकाशन, दिवाळी १९९२.

३०) देशपांडे गौरी - नानोंची नवलकथा, उपरिनिर्दिष्ट.

...........